VALMIKI RAMAYANA

SARGA 1

B. B. R. A. S.


वसिष्ठ
श्रीराम
सीता
लक्ष्मण
भरत
मारुती
शत्रुघ्न

श्रीगणेशाय नमः॥ श्रीसीतारामचंद्राय नमः॥ वागीशादिक विबुध हि सर्वोपर्योपक्रमीं नमुनि जातें॥ झालें कृतार्थ नति त्याचिंन
मणि देशिकांघ्रिजल जातें १ परमश्रेयोर्थी जो नरलोक व्यवहृतींत जरि मग्न श्रीरामायणपाठें होय तयाचीं कुकर्मततिभग्न
२ ऐहिकही धनजायासुतादिक श्रेष्ठही सुखें जीजी येतीन यत्न करितां किंबहुना काळही करीजीजी ३ हें रामायण गौरव
सत्यवतीतनय विस्तरें वदला यास्तव सतत ऋषीत दृतचि नचि ह्दतिआ वरुनि सकला ४ पाहुनि दीर्घ साधु हि वेदपुराणा
दि सर्वइतिहास निश्चय वदति जनाप्रति विश्वासधराकरा न परिहास ५ श्रीरामकथारससम इह परलोकीं कसुखद रस ना
हीं यास्तव सर्व हि विसरुनि सेउं रामायणाचि रस नाहीं ६ श्रम मात्र घडे अर्थज्ञानाविण बहु हि घोकित्या वेद अर्थज्ञानें सहज
पिपदस्या न दिसे चि जीवशिवभेद ७ स्थाणूच भारहारक अज्ञानें वेद पाठक रिकष्ट ऐसें वेदव्याख्यानिरुक्तिमध्यें पहाअसें स्पष्ट
८ तद्वत् पुराणकाव्यादिक पाठहि जाण त्यासुखद होती काव्यालाप विनिंदास्मृतींत जी ग्राम्यगीतपर होती ९ परिसंस्कृतार्थ
नेणति जे प्राकृत भाषणें कमार्ग नर होतील रामरसि ते निमग्न ऐसा करीन पथ सुकर १० रामायणभाव यथामति नेम हराष्ट्र
वाक्यगद्यानें लिहितों जन हो रामीं पावाल अविघ्नयाचि सद्यानें ११ रामायणार्थसिंधु तुनि जाया पारमज जडशिशितरी स्मृतिसद्
गुरुचरणाची मतिमोहाय खिलदोषनाशकरी १२

कोणे एके समईं प्राचेतस वाल्मीक ऋषीचे आश्रमीं नारद आला त्याप्रति वाल्मीकानें प्रश्न केला त्याचा सारांश ऐसा कीं शास्त्रोक्त सत्पुरु
षाहे सामुद्रिकादि शास्त्रप्रोक्त शरीराकार लक्षणादि अनेक सद्गुण आहेत त्यागुणाहीं विशिष्ट पुरुष कोण संप्रति काळीं आहे हे सांग
ण्यास नारदा तुं समर्थ आहेस यास्तव असा पुरुष कोण तो सांग त्यानंतर नारद विचार करून बोलला कीं हे ऋषे दुर्लभ बहुत गुण तूं
बोललास त्या गुणें करून युक्त संप्रति पुरुष कोण आहे तो सांगतों श्रवण कर इत्यादि रामाचें पूर्व चरित्र व त्याकाळापासून रामनिर्याण
पर्यंत भविष्य राम चरित्र संक्षेपें करून सांगून नारद गेला वाल्मीक माध्यान्हिक विधी साठीं तमसा नदीचे तीरीं गेला तेथें एक क्रौंच मिथु
न मदनवशें करून क्रीडा करित होते त्यांपैकीं पुरुषास कोणी व्याधानें बाणें करून ठार मारिलें तें पाहून ऋषीस कारुण्य उत्पन्न झाल्या
मुळें व्याधास शाप दिला तो शापवाणी पूर्वीं विचार योजनान सतां द्वात्रिंशदक्षर बद्ध अनुष्टुप् छंदाचा श्लोक च निघाला नंतर ह्या वाग्दे
वतां विलास अद्भुत झाल्यामुळें ऋषी फार चकीत होत्साता माध्यान्ह विधि आटोपून स्वाश्रमी गेला इतक्यांत तेथें साक्षात् चतुर्मुख ब्र-

त्या येउन वाल्मीकास आज्ञा केली कीं ही माझी प्रिया वाग्देवता मच्छंदे करून तुझा मुखी प्रवृत्त झाली आहे यास्तव श्रीरामाचें चरि
त्र अशा सुंदर वाणीनें नानाछंदें करून तूं वर्णन कर मत्प्रसादें करून रामलक्ष्मणसीतादिक तत्कथोपयुक्त पुरुषांचा अंतर्गत परमगू
ढही भाव तुला स्फुरेल असा आशिर्वाद ही देउन ब्रह्मा गेला नंतर वाल्मीकानें स्वस्थचित्तें करून कोटिशः ग्रंथरचना केली त्यापैकीं २४
हजार ग्रंथ लोकोपकारार्थ भूमीवर ठेविला व कुशीलव नामक यमल रामपुत्र यास सुस्वर पढविले त्याचें नाम महारामायण व वा
ल्मीक रामायण असें प्रसिद्ध आहे व धर्मशील व सुज्ञ पुरुष या रामायणाचे कथारसांत निमग्न होत्साते या लोकीं चे सुख भोगून परलो
काचें सुख पावले कदाचित् काव्यालापांश्च वर्जयेत् अशा स्मृतिप्रोक्त निषेध आहे तेव्हां काव्यरसांत निमग्न होणें हे नीट नव्हे अ
से ह्मणाल तरि ऐका इदं पवित्रं पापघ्नं इत्यादि जनश्च शूद्रोपि महत्त्वमीयात् इत्यंतं ग्रंथें करून या लोकांचें चांगलें फल या ग्रंथींच
उक्त आहे व शृण्वन् रामायणं भक्त्या यः पादं पादमेव वा स याति ब्रह्मणः स्थानं ब्रह्मणा पूज्यते सदा असें मूल रामायणी परलोकीं
चा शुभ फलाविषईं वाक्य आहे यास्तव निषेधक स्मृति वाक्याचें तात्पर्य केवळ विषयासक्तीनें ग्राम्यगीतादिकांत आसक्त होउन ये
असें दिसतें व प्राचीन रामायणाचे टीकाकार नागोजीभट्ट प्रभृति महापंडितांनीही अशाच युक्तीनें रामायणाचें माहात्म्य फार लिहिलें
आहे अह्मी अज्ञजनानी विशेष शाहणपण दाखवावें असें तर नाहींच परंतु जे रामभक्तिरसिक असून संस्कृतार्थ जाणावयास अशक्त
त्याकरितां रामायण भावार्थ महाराष्ट्रभाषेंत यथामति लिहितों

तपःस्वाध्यायनिरतं तपस्वी वाग्विदां वरं नारदं परिपप्रच्छ वाल्मीकिर्मुनिपुंगवं १ श्रीः ७ श्री

टीका तपस्वाध्यायनिरतं ह्मणजे तपश्चर्यारूप जो स्वाध्याय ह्मणजे निषिद्ध देशकालादि वर्ज पूर्वक अर्थज्ञानापर्यंत सशास्त्र
ध्ययन जें याचें नाव स्वाध्याय त्याचा ठाईं निरत ह्म॰ अत्यंत आसक्त व मुनिपुंगवं ह्म॰ मुनिमध्ये पुंगव ह्मणजे श्रेष्ठ व वाग्विदां ह्मणजे
उचित व मित व इष्ट भाषण करणारे वक्ते जे त्यामध्ये वरं ह्मणजे सर्वांहून सुज्ञ असा जो नारद यातें तपस्वी ह्मणजे गुरुमुखापासून मास
जो अर्थ याचा निदिध्यासाचा परिपाकापासून जो ब्रह्मज्ञानी असा वाल्मीकि ह्म॰ वाल्मीक जो तो परिपप्रच्छ ह्मणजे स्वेच्छागत नारदाची पूजा करू

कालोचित भाषण करित असतां त्यांत च अवकाश पाहून आपली इच्छित गोष्ट पुसता झाला १ टी॰ या श्लोकीं नुशब्द वितर्कार्थ जाणावा ह्मणजे जो अर्थ इच्छितो आहे कीं नाहीं तात्पर्य साधक बाधकाचा विचार अर्थ हे नारदा सांप्रत काळीं भूमीवर गुणवान् ह्मणजे चांगले गुणें करून युक्त आणि वीर्यवान् ह्मणजे गुणी असून अस्त्रादि बलवान् व धर्मज्ञ ह्मणजे या वर्णाश्रमादि संपद्विपद्दि त्कालीन सर्व धर्म रहस्य जाणणारा व कृतज्ञः ह्मणजे थोडा उपकार कोणी केल्यास मोठा असें मानून प्रसन्न होणार व सत्यवाक्यः ह्मणजे सर्वावस्थांचे ठाईं ही यथाश्रुत इष्टाव तसेंच बोलणारा दृढव्रतः ह्मणजे कशीही आपत्ति प्राणांतिक आली तरी आपले नियमाचा त्याग न करणारा असा कः ह्म॰ कोण २ सद्वृत्त संपादक आचारवान् कोण व प्राणिमात्राचे ठाईं वशाचूसहीइहलोक परलोकचे हित देणारा कोण व विद्वान् ह्म॰ आत्मानात्म सकल पदार्थ तत्व ज्ञान समर्थ व लौकीक व्यवहारी प्रजारंजनादि चातुर्य जें याचे नांव सामर्थ्य तेणे करून युक्त कोण व क

> कोन्वस्मिन्सांप्रतं लोके गुणवान्कश्च वीर्यवान् धर्मज्ञश्च कृतज्ञश्च सत्यवाक्यो दृढव्रतः २ चारित्रेण च को युक्तः सर्वभूतेषु को हितः विद्वान्कः कः समर्थश्च कश्चैकप्रियदर्शनः ३ आत्मवान्को जितक्रोधो द्युतिमान्कोनसूयकः कस्य बिभ्यति देवाश्च जातरोषस्य संयुगे ४

श्चैकप्रियदर्शनः ह्म॰ कामाधिक सौंदर्यें करून व नित्य कसरवरूपत्वें करून एक ह्म॰ केवळ प्रियच आहे दर्शन ज्याचे असा कोण ३ आत्मवान् ह्मणजे अंतःकरण वश करणारा कोण व जित क्रोधः ह्मणजे निंदा हिंसादिक क्रूर ज्या चित्तवृत्ति त्या रहित व प्रसंगात् क्रोधशब्द कामादिकांचे उपलक्षणार्थ जाणावा ह्म॰ कामादि षड्रिपु ज्याणें जिंकिले असा कोण द्युतिमान् ह्म॰ सर्व लोकांस वारंवार पाहाण्याची प्रबल इच्छा उत्पन्न होय अशा देहकांतीने युक्त असा कोण अनसूयकः ह्म॰ विद्या व ऐश्वर्यादिकांचे ठाईं पराची उन्नती जाहली तीन सोसणें याचें नाव असूया तद्रहित असा कोण आणि संयुगे जातरोषस्य कस्य देवाः बिभ्यति ह्म॰ युद्धकालीं ज्यास क्रोध प्राप्त जाहला असतां इंद्रादि देवही भय पावतात असा कोण ४

हे महर्षे ह्म॰ श्रेष्ठऋषे एतत् ह्म॰ दिव्य पुरुष गुणसमुदाय कोणत्या पुरुषास आहे हें ऐकण्याविषयीं मी इच्छितो हें सांगीतले ले सर्व गुण एक पुरुषाचे ठाईं असणें हें फार दुर्लभ यास्तव असा पुरुष कोण आहे हें समजल्यानें मला इतरजावाला कौतुक उत्पन्न करणार आहेत त्यापेक्षां परं ह्म॰ फार कौतूहलं ह्म॰ हौस आहे हे नारदा एवंविध ह्म॰ अशा नरं ह्म॰ पुरुषाते ज्ञातुं ह्म॰ जाणावयास त्वं ह्म॰ तूं समर्थ ह्म॰ योग्य असि ह्म॰ आहेस ५ टी॰ एतत् ह्म॰ हें पूर्वोक्त वाल्मीकेः ह्म॰ वाल्मीकाचे वचः ह्म॰ वचन जें त्यातें श्रुत्वा ह्मणजे श्रवण करून त्रिलोकज्ञः ह्म॰ भूर्भुवःस्वः संज्ञक तीन लोकांचे वृत्त जाणणारा नारद जो, तो वाल्मीकातें श्रूयतां ह्म॰ ऐकावें

> एतदिच्छाम्यहं श्रोतुं परं कौतूहलं हि मे महर्षे त्वं समर्थोसि ज्ञातुमेवंविधं नरं ५ श्रुत्वा चैतत्त्रिलोकज्ञो वाल्मीकेर्नारदो वचः श्रूयतामिति चामंत्र्य प्रहृष्टो वाक्यमब्रवीत् ६ बहवो दुर्लभाश्चैव ये च या कीर्तिता गुणाः मुने वक्ष्याम्यहं बुध्वा तैर्युक्तः श्रूयतां नरः ७

अशा वाक्यें करून आमंत्र्य ह्म॰ संमुख करून रामचंद्राचे गुण वर्णन करावे असें बहु काळ इच्छितच होतो तादृशार्थाचा जाण्यांस इच्छक मिळाला येणें करून प्रहृष्टः ह्म॰ हर्षयुक्त होऊन वाक्यमब्रवीत् ह्म॰ वचन बोलता जाला ६ टी॰ हे मुने ह्म॰ वाल्मीक ऋषी जे बहवः ह्म॰ बहूत, गुणाः ह्म॰ गुण, कीर्तिताः ह्म॰ तूं बोललास तें एका पुरुषाचे ठाईं असा प्राकृत पुरुषांत एक पुरुषीं सर्व गुण शहणें दुर्लभच आहेत थापि तैः ह्म॰ त्या सर्व गुणानीं जो युक्त त्यातें बुध्वा ह्म॰ जाणून अहं ह्म॰ मी वक्ष्यामि ह्म॰ सांगतों नरः ह्म॰ तो नर श्रूयतां ह्मणजे श्रवण कर ७

तात्पर्य हे नारदा या प्रकारचा पुरुषास तूं जाणण्यास योग्य आहेस त्याकरितां सांग २ असें वाल्मीकानें बोलल्यावर त्रैलोक्यांतील बातमी जाणणार नारद मोठ्या संतोषानें बोलूं लागला ६ तें असें कीं हे ऋषी तूं बहूत गूण सांगीतले त्या गुणाहीं युक्त पुरुष जाणून तुला सांगतों तो ऐक ७

टी॰ इक्ष्वाकुवंशप्रभव ह्मणजे इक्ष्वाकु नामक प्रसिद्ध राजा जो त्याचे वंशाचे ठाईं प्रगट आलेला जो राम या नावेंकरून जनैः ह्म॰ जनांत श्रुत ह्म॰ प्रसिद्ध आहे त्याचे ठाईं त्याच नामाच्या अर्थ आणि तुं पुशिले ते सर्व गूण व आणीकही शास्त्रोक्त सद्गुण आहेत असें दिसतें कसें पुसाल तर ऐका ३ रमंते योगिनो स्मिन्निति रामः या अर्थेंकरून परलोकहितावह सर्व गूण आहेत अथवा रमयति लोकान् इति रामः येणेंकरून इहलोकहितावह गुणसंग्रह स्पष्ट आहे कोणते गूण या आकांक्षेच्या वारणार्थ यथाशक्त्या गुणानुवर्णन कंठरवेंकरून करितों राम कसा ह्मणाल तर नियतात्मा ह्म॰ स्वाधीन आहे अंतःकरण ज्याचें आणि महावीर्यः ह्म॰ वीर्यशब्दव्याख्या पूर्वश्लोकीं चलिहिली आहे व द्युतिमान् ह्म॰ देहकांतीकरून युक्त, धृतिमान् ह्म॰ आपत्तीचे ठाईं चित्तविकार न होणें एकरूप राहणें याचें नांव धृति तद्युक्त व वशी ह्म॰ अशेष बाह्येंद्रियें जाणें जिंकिली आहेत ८

इक्ष्वाकुवंशप्रभवो रामो नाम जनैः श्रुतः नियतात्मा महावीर्यो द्युतिमान् धृतिमान् वशी ८ बुद्धिमान् नीतिमान् वाग्मी श्रीमान् शत्रुनिबर्हणः विपुलांसो महाबाहुः कंबुग्रीवो महाहनुः ९

बुद्धिमान् ह्म॰ एकवारच हितार्थाचे अभीष्ट कार्यीं विस्फुरण व दुष्कल्पनेच्या त्याग व सत्कल्पनेचे ग्रहण ज्याचे बुद्धीचे अशा प्रशस्त बुद्धिकरून युक्त व नीतिमान् ह्म॰ कामंदकादि शास्त्रप्रसिद्ध सर्व राजनीती जाणणारा व वाग्मी ह्म॰ प्रशस्त वाणीकरून युक्त व श्रीमान् ह्म॰ सर्वांहून अतिशयित शोभा किंवा ऐश्वर्य ज्याचे अथवा ऋग्यजुःसामाख्य वेदत्रय ज्ञान जें या स श्री अशी संज्ञा यजुर्वेदांत आहे त्या वैदिकश्रीने युक्त व शत्रुनिबर्हणः ह्म॰ ब्रह्मद्वेषी जे यांचा नाशकर्ता व विपुलांसः ह्म॰ मांसयुक्त व उन्नत स्कंध ज्याचे व महाबाहुः ह्म॰ दीर्घ व पुष्ट भुज ज्याचे व कंबुग्रीवः ह्म॰ शंखासारिख्या तीन रेषाहीं युक्त आहे कंठ ज्याचा व महाहनुः ह्म॰ कपोलाचा अपरभाग ज्याचा अति मांसयुक्त असो विपुलांस इत्यादिक हीं चार विशेषणें सामुद्रिकांत सल्लक्षणें असें आहे यास वररुचिचें वचन कक्षः कुक्षिश्च वक्षश्च घ्राणस्कंधौ ललाटिका सर्वभूतेषु निर्दिष्टा उन्नतास्ते सुखप्रदाः,,१" ब्राह्मे शिरो ललाटः श्रवणे ग्रीवा वक्षश्च हस्तथा उदरं पाणिपादौ च पृष्ठदेशे महत्सुखं,,२" पूर्णमांसलहनुस्तु भूपतिः इति संहितावाक्यं,,९ आठापासून वीस श्लोकांपर्यंत विशेषणें ह्मणून तात्पर्य लिहिलें नाहीं

महोरस्कः ह्म॰ विशाळ आहे वक्ष ह्म॰ उर ज्याचे,,उरः शिरो ललाटं चेत्यादि विशालस्ते सुखप्रदाः इति सामुद्रिके,,महेष्वासः ह्म॰ महान् आहे धनुष्य ज्याचें गूढजत्रुः गूढ ह्म॰ मांसनिमग्न आहेत जत्रु ह्म॰ वक्षांससंधिगत अस्थी ज्यांची अरिंदमः ह्म॰ निजभक्तादिक रिपु तें निजभक्तिनेंच जिंकितो यद्वा अरिंदमः ह्म॰ राजा सही अन्वर्थ संज्ञा शत्रुंजय अशी आहे व आजानबाहुः ह्म॰ जानुपर्यंत दीर्घ आहेत भुज ज्याचे ब्राह्मे दीर्घ,,भ्रू बाहुमुष्कश्च चिरजीवी धनी नर इति,,सुशिराः ह्म॰ समवर्तुल आहे मस्तक ज्याचें, नारदस्मृतौ,,समवृत्तशिराश्चैव छत्राकारशिरास्तथा एकछत्रां महीं भुंक्ते दीर्घमायुश्च विंदति,,सुललाटः ह्म॰ रेखाधिक ललाटेंकरून युक्त, कात्यायनः, ललाटे यस्य दृश्यंते च तुस्त्रिद्व्येकरेखिकाः शतद्वयं शतं चापि तस्यायुर्विंशतिस्तथा,, सुविक्रमः ह्म॰ गजसिंहादि समान प्रगल्भ आहे पादविक्षेप ज्याचा,,विक्रमः पादविक्षेपः,,ब्राह्मे" स्वरो गतिश्च नाभिश्च गंभीरः संप्रदृश्यते,,१० टी॰ समः ह्म॰ अति दीर्घ व अति ह्रस्व नव्हे ओव समविभक्तांगः ह्म॰ सम ह्म॰ अन्यूनाधिक परिमाण व विभक्त ह्म॰ पृथक्भूत ऐसे आहेत अंगें ह्म॰ शरीरावयव ज्याचे

महोरस्को महेष्वासो गूढजत्रुररिंदमः आजानबाहुः सुशिराः सुललाटः सुविक्रमः १० समः
समविभक्तांगः स्निग्धवर्णः प्रतापवान् पीनवक्षा विशालाक्षो लक्ष्मीवान् शुभलक्षणः ११
धर्मज्ञः सत्यसंधश्च प्रजानांच हिते रतः यशस्वी ज्ञानसंपन्नः शुचिर्वश्यः समाधिमान् १२

व स्निग्धवर्ण ह्म॰ स्निग्ध श्यामवर्ण ज्याचा सामुद्रिके,,स्निग्धेंद्रनीलवर्णस्तु भोगं विंदति पुष्कलमिति व प्रतापवान् ह्म॰ स्मरणमात्रेंकरून रिपुहृदयाचें विदारण व्हावया जोगें पौरुष ज्याचें व पीन ह्म॰ पुष्ट आहे वक्ष ह्म॰ उरस्थल ज्याचे विशाल ह्मणजे दीर्घ आहेत नेत्र ज्याचे व लक्ष्मीवान् ह्म॰ सर्वावयव सौंदर्यवान् व शुभलक्षणः ह्म॰ उक्तरीत्या सामुद्रिक शास्त्रोक्त सल्लक्षणें ज्याचीं ११ टी॰ धर्मज्ञ शब्दव्याख्या पूर्वींलिहिली व सत्यसंधः सत्या ह्म॰ खरी आहे संधा ह्म॰,,सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद्व्रतं मम इत्यादि,,रूपिणी प्रतिज्ञा ज्याची व प्रजांचा कल्याणास सादर जो व यशस्वी रावणवधादि दिव्य यशेंकरून संपन्न व ज्ञानसंपन्न ह्म॰ ब्रह्मज्ञानपरिपूर्ण व शुचिः ह्म॰ प्रातःस्नान प्राणायामाभ्यासादिकें करून नित्य बाह्यांतर शुद्ध व वश्य ह्म॰ पिता गुरु देव याचे ठाईं विनत व समाधिमान् ह्म॰ निजतत्त्व समाधियुक्त १२

प्रजापतिसमः ह्म० ब्रह्मदेवासारिखा यद्यपि रामहा परब्रह्मच तथापि औपाधिक भेदरचीकारामुळें शोकमोहादिक मायिक मानुषधर्म त्याचे ठाईं दिसतात याजवरून ब्रह्मसाम्य गुणांत गणितात व श्रीमान् इत्यादि शब्द पुनःपुनः येतात हें सकलैश्वर्यादि महत्व बोधार्थ जाणावें व धाता ह्म० पित्याचेपरि सर्व प्रजा धारण पोषण सामर्थ्यें करून युक्त व रिपुनिषूदनः ह्म० आश्रित जनाचे शत्रूंचा नाश कर्ता व जीवलोकस्य ह्म० सकल प्राणि समूहाचा रक्षिता ह्म० सकल व्यवहार प्रवर्तक व धर्मस्य परिरक्षिता ह्म० तत्तद्वर्णाश्रम धर्मांचा रक्षिता ह्म० मर्यादापालक १३ स्वस्य धर्मस्य ह्म० यज्ञाध्ययन दान दंड युद्धादि रूप क्षत्र धर्माचा रक्षिता ह्म० सादर अनुष्ठाता व स्वजनस्य रक्षिता ह्म० आवश्य भावी ही अनिष्ट जे तन्निरास पूर्वक मोक्षाद्य भीष्ट स्वभक्तांस देणारा, वेदवेदांगतत्वज्ञः ह्म० ऋग्यजुसामाथर्वाख्य वेद व छंद कल्प व्याकरण ज्योतिष निरुक्त शिक्षा रूप वेदांगे यांचें तत्व जाणणारा शस्त्रास्त्रादि प्रतिपादक शास्त्ररूप धनुर्वेदाचे ठाईं निष्ठत ह्म० सम्यक् ज्ञाता १४

प्रजापतिसमः श्रीमान् धाता रिपुनिषूदनः रक्षिता जीवलोकस्य धर्मस्य परिरक्षिता १३ रक्षिता स्वस्य धर्मस्य स्वजनस्य च रक्षिता वेदवेदांगतत्वज्ञो धनुर्वेदे च निष्ठितः १४ सर्वशास्त्रार्थतत्वज्ञः स्मृतिमान् प्रतिभानवान् सर्वलोकप्रियः साधुरदीनात्मा विचक्षणः १५

टीका सर्वशास्त्रार्थतत्वज्ञः ह्मणजे सांख्य,योग,तर्क,पूर्वोत्तर मीमांसा,सूत्रें,सव्याख्या स्मृति,उपस्मृति,सर्व मूल शब्द शासक व्याकरण,व कामंदकादि नीति शास्त्र,या सर्वांच्या अर्थ तत्वांतें जाणणारा व स्मृतिमान् ह्मणजे सांगीतले व पढिलेलीजीं वेद शास्त्रें त्याचें विस्मरण होत नाहीं जास असा व प्रतिभानवान् ह्मणजे व्यवहार कालीं उचित शास्त्राचें शीघ्र स्फुरण जें याचें नाव प्रतिभान त्युक्त व सर्वलोकप्रिय ह्मणजे पाहणार व स्मरण करणारांस इहपर सुखावह जो व साधु ह्मणजे मृदु मधुर स्वभाव,व,अदीनात्मा ह्मणजे सहज असाधारण क्षात्र स्वभावें करून गंभीर स्वभावाचा अथवा अति दुःख वारंवार जालें त्याविषयी अंतःकरणीं क्षोभ नाहीं विचक्षणः ह्मणजे यथोचित लौकिक सर्व क्रियांचे ठाईं कुशल १५ ७॥

टी० सर्वदा ह्म० निरंतर होम,देवपूजा कालाचे ठाईं तत्तत्कालोचित उत्तम सात्विक स्वभावें करून,अभिगत ह्म० युक्त,व पुरोहित,मंत्रि प्रधानादिकें करून युक्त,इव ह्म० असा,सिंधुभिः ह्म० नद्यांहीं करून युक्त समुद्रासारिखा,किंवा सद्भिः ह्म० शरणांगत भक्तानी निरंतर सेवित होय,व,आर्य ह्म० सर्वांस पूज्य,च,सर्वसम ह्म० सकल सुख दुःखाचे उत्तरफलीं,सम ह्म० हर्ष विषाद रहित,किंवा शत्रु मित्रो दासीनाचे ठाईं वैषम्य रहित,व,सदैव ह्म० सर्वावस्थाचे ठाईं,प्रियदर्शन ह्म० वारंवार विस्मयें करून प्रियदर्शन जाचें. १६ सचेति सर्वगुणोपेतः ह्म० उक्त वक्ष्यमाण गुणाहीं करून युक्त,कौसल्यानंदवर्धनः ह्म० या पदाने अर्थ होतो कीं उत्तम कुलाचे ठाईं उत्पन्नत्व,आणि श्रेष्ठ पट्टाभिषेक स्त्रियांचे पुत्रत्वादि रूपास अभिषेकोचित धर्मसत्ता दर्शित होते,गांभीर्ये ह्म० गांभीर्याविषयीं समुद्रासारिखा,व,धैर्येण ह्म० धैर्याविषयीं हिमवान् पर्वतासारिखा ह्म० अंतःकरणें करून ही अधृष्यत्व आणि इष्ट वियोगाचे ठाईं अपराजितत्व,आणि रणाचे ठाईं अचलत्वें करून स्थिती ह्मणून हिमवत्सदृश होय,१७ टी० वीर्ये ह्म० पराक्रमाविषयीं,विष्णुना ह्म० विष्णूशीं,सदृश ह्म० समान होय,व सोमवत् ह्म० चंद्रासारिखे,प्रियदर्शन ह्म० अवलोकन कालीं प्रीतिकर आहे दर्शन जाचें,व क्रोधे ह्म० क्रोधकालीं,व,युद्धकाळीं कालाग्निसदृश ह्म० प्रळयाग्नीसारिखा,व,शत्रूने अपकार केला असत्यास त्याचें उलट करण्याविषयीं सामर्थ्य असतांहीं क्षमया ह्म० शांतीविषयीं पृथ्वीसमान् होय १८ टी० त्यागे ह्म० धर्मार्थ द्रव्य खर्चाविषयीं,धनदेन ह्म० कुबेराशीं,समह्म० समान व धन संग्रहाविषयींही त्यासमानच,आणि सत्ये ह्म० सत्यभाषणाविषयीं,दुसरा धर्मच होय,या श्लोकांत इव शब्द उत्प्रेक्षावाचक जाणावा,व,धनदेन या श्लोकापर्यंत बालकांडाचा अर्थसंग्रह होतो तो असा कीं इक्ष्वाकुवंशप्रभव येणें करून प्रसिद्ध स्वरूपाचें प्रगट होणे हें सूचित होतें व महार्थस्तु निबर्हण इत्यादिकें करून विश्वामित्राचा अनुग्रहानें शस्त्रें व अस्त्रें यांची संपत्ती व ताटकावधादि सूचित होतें,व लक्ष्मीवान् या श्लोकानें सीतेचा विवाह सूचित होतो,व,सत्यपराक्रम येणें करून परशरामाची परलोक गति कुंठित केली असें सूचित होतें,व,तमेव इत्यादि श्लोकानें अयोध्याकांडाचा अर्थसंग्रहारंभ जाणावा,असो पूर्व वर्णित राम,कल्याण गुणानें युक्त,व,सत्यपराक्रम ह्म० सफल आहे पराक्रम ज्याचा,१९

सर्वदाभिगतः सद्भिः समुद्र इव सिंधुभिः आर्यः सर्वसमश्चैव सदैव प्रियदर्शनः १६ सच सर्वगुणोपेतः कौसल्यानंदवर्धनः समुद्र इव गांभीर्ये धैर्येण हिमवानिव १७ विष्णुना सदृशो वीर्ये सोमवत्प्रियदर्शनः कालाग्निसदृशः क्रोधे क्षमया पृथिवीसमः १८ धनदेन समस्त्यागे सत्ये धर्म इवापरः तमेवं गुणसंपन्नं रामं सत्यपराक्रमम् १९

टी० ज्येष्ठं ह्म० वडील व श्रेष्ठ गुणैः ह्म० दयादाक्षिण्यादि आणि शौर्य व औदार्य व यौवराज्याभिषेकास योग्य अशा उत्तम गुणाहीं युक्त, व प्रियं ह्म० इष्ट, प्रकृतीनां ह्म० प्रजेस, हितैः ह्म० हितकारक, अशा गुणाहीं युक्त, व प्रकृतिप्रियकाम्यया ह्म० आपणास इष्ट व्हावें या इच्छेनें, सुतं ह्म० पुत्रास जो राजा दशरथ २० टी० तो, यौवराज्येन ह्म० यौवराज्याशीं, संयोक्तुं ह्म० योजना करावी ह्मणून, प्रीत्या ह्म० प्रीतीनें, ऐच्छत् ह्म० इच्छूं लागला या श्लोकांतील यौवराज्य शब्दाचा अर्थ असा कीं पिता राज्य करीत असतां सर्वराज्यव्यापाराविषईं अभिषेकपूर्वक अधिकारी पुत्राला युवराजा असें ह्मणतात, असो, अथ ह्म० अनंतर, तस्य ह्म० त्या रामचंद्राचे, अभिषेकसंभारान् ह्म० ऋग्वेदी ब्राह्मणानें सांगितलेली दधिमधुघृतइत्यादि साहित्यातें कैकयी स्त्री दृष्ट्वा ह्म० पाहून २१ टी० पूर्वं ह्म० पूर्वी, दत्तवरा ह्म० दिले आहेत वर जीस, अशी, देवी ह्म० कैकयी, एनं ह्म० या राजा

ज्येष्ठं श्रेष्ठगुणैर्युक्तं प्रियं दशरथः सुतं प्रकृतीनां हितैर्युक्तं प्रकृतिप्रियकाम्यया २० यौवराज्येन संयोक्तुमैच्छत्प्रीत्या महीपतिः तस्याभिषेकसंभारान् दृष्ट्वा भार्याथ कैकयी २१ पूर्वं दत्तवरा देवी वरमेनमयाचत विवासनं च रामस्य भरतस्याभिषेचनम् २२ स सत्यवचनाद्राजा धर्मपाशेन संयतः विवासयामास सुतं रामं दशरथः प्रियं २३

स, वरं अयाचत ह्म० वर मागूं लागली ते दोन वर कोणते अशी आकांक्षा आली असतां रामस्य ह्म० रामचंद्रास विवासनं ह्म० वनवास, व, भरतस्य ह्म० भरतास, अभिषेचनं ह्म० पट्टाभिषेक असें समजावें, व, हे वर कोणते वेळेस कैकयीस मिळाले असें ह्मणाल तर पूर्वी कोणी एककाली इंद्रास साहाय्य करावें ह्मणून स्वर्गलोकीं दशरथ गेला तेथें दैत्याशीं दशरथ युद्ध करीत असतां शत्रूनें पाठविली सुंदरी माया तिचें निवारण कैकयीनें केलें ह्मणून राजानें दोन वर दिल्हे असत २२ टी० सः ह्म० तो दशरथ राजा, सत्यवचनात् ह्म० सत्यप्रतिज्ञा मुळें, व, धर्मपाशेन ह्म० धर्मपाशें करून संयतः ह्म० बद्ध होत्साता, प्रियं ह्म० इष्ट, सुतं ह्म० पुत्र यास, विवासयामास ह्म० वनवासा करितां पाठविता जाहला २३

तात्पर्य त्या रामाला पट्टाभिषेक करावा ह्मणून राजा दशरथ इच्छूं लागला २१ तदनंतर त्या रामचंद्राचा अभिषेक कैकयी पाहून दशरथास वर मागूं लागली काय ह्मणाल तर रामाला वनवास व भरतास राज्याभिषेक असे दोन वर मागीतले २२ नंतर राजा दशरथानें आपले भाषणास खोटेपणा येईल या भीतीनें रामाला वनवासास पाठविले २३ ७॥ ७॥ ७॥

टी० रणांगणीं हे वीर हो मी तुह्मास मारितों असें ह्मणून वीरः ह्म० युद्ध करणार अरी होत्साता पिसः ह्म० तो रामचंद्र, पितुः ह्म० पित्याचा, प्रतिज्ञां ह्म० सत्य भाषणातें, अनुपालयन् ह्म० पालणारा पितुः ह्मणजे पित्याचा, निर्देशात् ह्म० आज्ञेमुळें, आणि कैकेया ह्म० कैकेयीस, प्रियकारणात् ह्म० इष्ट व्हावें ह्मणून, वनं ह्म० अरण्यांप्रत जगाम ह्म० गेला, २४ टी० व्रजंतं ह्म० गमन करणार तं ह्म० तो रामचंद्र याजप्रत स्नेहात् ह्म० प्रीतीनें, विनयसंपन्नः ह्म० नम्रत्वें करून, संपन्न ह्म० युक्त, सुमित्रानंदवर्धनः ह्म० सुमित्रेला आनंद वृद्धी करणार, प्रिय ह्म० इष्ट, भ्राता ह्म० बंधू असा लक्ष्मण, अनुजगाम ह ह्म० गेला, २५ टी० भ्रातुः ह्म० रामचंद्रास, सौभ्रात्रं ह्म० उत्तम बंधुत्वातें, अनुदर्शयन् ह्म० दाखविणारा, भ्राता ह्म० बंधु, दयित ह्म० प्रिय असा लक्ष्मण ही, त्या रामाला अनुसरित आला, या श्लोकाचा पूर्वार्धाचा पूर्व श्लोकीं अन्वय आणि

स जगाम वनं वीरः प्रतिज्ञामनुपालयन् पितुर्वचननिर्देशात्कैकेयाः प्रियकारणात् २४ तं व्रजंतं प्रियो भ्राता लक्ष्मणोनुजगाम ह स्नेहाद्विनयसंपन्नः सुमित्रानंदवर्धनः २५ भ्राता दयितो भ्रातुः सौभ्रात्रमनुदर्शयन् रामस्य दयिता भार्या नित्यं प्राणसमा हिता २६ सीताप्यनुगता रामं शशिनं रोहिणी यथा पौरैरनुगतो दूरं पित्रा दशरथेन च २७

उत्तरार्धाचा पुढील श्लोकीं अन्वय, रामस्य ह्म० रामाची, दयिता ह्म० प्रिया, भार्या ह्म० स्त्री, नित्यं ह्म० निरंतर, प्राणसमा ह्म० आपले प्राणाचा समान हिता ह्म० हितकरणारी, २६ टी० पौरैः ह्म० नागरिक लोकानीं, व, दशरथानेही, दूरं ह्म० दूर, अनुगतं ह्म० पाठविलेला, रामं ह्म० रामचंद्राप्रत सीता ही गेली, यथा ह्म० जसी शशिनं ह्म० चंद्राप्रत रोहिणी जाते त्या प्रकारानें सीता गेली, २७

तात्पर्य हा राम अतिवृद्ध दशरथाचा भाषणानें कसा होगेला असें ह्मणाल तर तसें नव्हे लोकन्याय असा आहे कीं साटीबुधीनाटी तेव्हां त्याचें कांमाना केंत्यास तर बहु सहस्र वर्षें आलीं होतीं रामानें पितृवचनाचा भंग न व्हावा यवेडी कैकेयीलाही संतोष वाटावा ह्मणून अरंण्यास गेला २४ रामाचे ठाईं स्वभावानें प्रीतियुक्त व सुमित्रेस ही प्रीती फार करणार ओ लक्ष्मण तो ही त्या रामाला अनुसरून गेला २५ त्यानंतर रामाला बहुत सुख देणारी व अतिशय प्रेमेचें स्थान आणि जनकवंशीं उत्पन्न आली, असें ह्मणाल तर परंतु ही सीता अयोनिजा आहे, कसी ह्मणाल तर, जनकाचा यज्ञभूमी पासून प्रगट आली या करितांच देवमायेति निर्मिता असें सांगीतलें आहे आणि सकल स्त्री लक्षणाहीं युक्त २६ असी सीता ती रामचंद्रा बरोबर गेली हे ति घेनि घाल्यावर नगरांतील लोकांहीं व दशरथानें हीं शोकाविष्ट होऊन त्यांस पोहचविले २७

शृंगिबेरपुरे ह्म॰ शृंगिबेर नामक नगराचे ठायीं राहणार,निषादाधिपतिं ह्म॰ निषादाचा स्वामी,प्रियं ह्म॰ इष्ट,गुहं ह्म॰ गुहाप्रत,धर्मात्मा ह्म॰ रामचंद्र, आसाद्य ह्म॰ प्राप्त होऊन,गंगा कूले ह्म॰ भागीरथीचा तीरीं,सूतं ह्म॰ सारथीतें,व्यसर्जयत् ह्म॰ तूं माघारें जा,१ असें सांगीतलें २८ टी॰ गुहेन ह्म॰ गुहाशीं,सहित ह्म॰ युक्त,लक्ष्मणेन ह्म॰ लक्ष्मणाशीं,च ह्म॰ आणखी,सीतया ह्म॰ सीतेशीं युक्त,रामः ह्म॰ रामचंद्र,वनेन ह्म॰ अरण्येकरून,वनं ह्म॰ दुसरे वनांत गत्वा ह्म॰ जाऊन बहूदकाः ह्म॰ फार आहेत उदकें ज्यामध्यें अशा,नदीः ह्म॰ नद्यातें,तीर्त्वा ह्म॰ उतरून २९ टी॰ चित्रकूटं ह्म॰ चित्रकूटाप्रत,अनुप्राप्य ह्म॰ जाऊन,भरद्वाजस्य ह्म॰ भरद्वाजाचा,शासनात् ह्म॰ आज्ञें करून रम्यं ह्म॰ सुंदर,आवसथं ह्म॰ राहाण्याचें स्थान,कृत्वा ह्म॰

शृंगिबेरपुरे सूतं गंगाकूले व्यसर्जयत् गुहमासाद्य धर्मात्मा निषादाधिपतिं प्रियम् २८ गुहेन सहितो रामो लक्ष्मणेन च सीतया ते वनेन वनं गत्वा नदीस्तीर्त्वा बहूदकाः २९ चित्रकूटमनुप्राप्य भरद्वाजस्य शासनात् रम्यमावसथं कृत्वा रममाणा वने त्रयः ३० देवगंधर्वसंकाशास्तत्र ते न्यवसन् सुखं चित्रकूटं गते रामे पुत्रशोकातुरस्तथा ३१

करून,व,ने ह्म॰ अरण्याचे ठायीं,त्रयः ह्म॰ ते तिघेजणें,रममाणाः ह्म॰ क्रीडा करणार आहले,३० टी॰ देवगंधर्वसंकाशाः ह्म॰ देवगंधर्वासारिखे,तत्र ह्म॰ तेथें ते तिघेजणें सुखं ह्म॰ सुखेंकरून न्यवसन् ह्म॰ राहिले,चित्रकूटं ह्म॰ चित्रकूटाप्रत रामे ह्म॰ तो राम,गते ह्म॰ गेला असतां,अनंतर राजा दशरथ पुत्रशोकातुरः ह्म॰ पुत्रशोकानें आतुर ह्म॰ पीडित, ३१ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

तात्पर्य मार्गामध्यें सुमंत्र प्रधान व रामचंद्र या उभयतांहीं मसलत केली कीं जनसमुदाय बहुत मिळाला याकरितां सर्वांहीं निद्रा केली असतां मध्यरात्रीं उठून आडवाटेनें ते चव घे ही गंगातीरीं पावले,तदनंतर त्या गंगातीरीं सारथ्याला सोडून गुह या नांवाचा नावाडी याशीं रामचंद्र मिळाला २८ आणि त्या गुहाला बरोबर घेऊन वनांचें उल्लंघन करून व परिपूर्ण नदी उतरून २९ चित्रकूट अरण्यांत गेले,तेथें भरद्वाज ऋषीनें सांगीतलें कीं,तुह्मीं उत्तम पर्णशाला बांधून वास्तव्य करावें,व ते ही,रमणीय पर्णशाला करून राहिले ३० त्यानंतर अयोध्या नगरांतील वर्तमान पुसाल तर सांगतों,१ चित्रकूटीं राम गेला असतां दशरथ राजा पुत्रशोकानें आतुर होऊन स्वर्गलोकीं गेला,३१ ७॥

टी॰ राजा दशरथः स्वर्गं ह्म॰ स्वर्गलोकाप्रत,जगाम ह्म॰ गेला तस्मिन् ह्म॰ तो दशरथ गते ह्म॰ गेला असतां,वसिष्ठप्रमुखैः ह्म॰ वसिष्ठ आहे,प्रमुख ह्म॰ श्रेष्ठ ज्यामध्यें,अशा द्विजैः ह्म॰ ब्राह्मणांहीं ३२ टी॰ नियुज्यमानः ह्म॰ योजिला,महाबलः ह्म॰ मोठा समर्थ जो भरत,तो,राज्याय ह्म॰ राज्यासाठीं,नैच्छत् ह्म॰ नाहीं इच्छिता जाहला,व,रामपादप्रसादकः ह्म॰ रामचंद्राचे पाद आहेत प्रसादकः ह्म॰ पूज्य ज्यास,स ह्म॰ तो भरत,वीरः ह्म॰ पराक्रमी,वनं ह्म॰ अरण्यांप्रत,जगाम ह्म॰ गेला, ३३ टी॰ आर्यभावपुरस्कृतः ह्म॰ श्रेष्ठ भाव,पुरस्कृतः ह्म॰ ज्याणें पुढें केला,सः ह्म॰ असा तो भरत, महात्मानं ह्म॰ महान् ह्म॰ मोठा आहे आत्मा ह्म॰ धैर्य ज्याचें,व,सत्यपराक्रमं ह्म॰ सत्य आहे पराक्र

राजा दशरथः स्वर्गं जगाम विजयन्सुतम् मृते तु तस्मिन् भरतो वसिष्ठप्रमुखैर्द्विजैः ३२ नियुज्यमानो राज्याय नैच्छद्राज्यं महाबलः स जगाम वनं वीरो रामपादप्रसादकः ३३ गत्वा तु स महात्मानं रामं सत्यपराक्रमम् अयाचत् भ्रातरं रामं आर्यभावपुरस्कृतः ३४ त्वमेव राजा धर्मज्ञ इति रामं वचोब्रवीत् रामोपि परमोदारः सुमुखः सुमहायशाः ३५

म ज्याचा,व,भ्रातरं ह्म॰ बंधू,रामं ह्म॰ अशा रामचंद्राप्रत, गत्वा ह्म॰ जाऊन,अयाचत् ह्म॰ मागूं लागला, ३४ टी॰ धर्मज्ञः ह्म॰ धर्म जाणणार राजा,त्वमेव ह्म॰ तूंच आहेस,इति ह्म॰ या प्रकारें करून,रामं ह्म॰ रामचंद्राप्रत, वचः ह्म॰ वाक्यातें,अब्रवीत् ह्म॰ बोलूं लागला,सुमहायशाः ह्म॰ उत्तम आहे, यश ह्म॰ कीर्ती ज्याची,व,सुमुखः ह्म॰ उत्तम आहे मुख ज्याचें,व,परमोदारः ह्म॰ उत्कृष्ट आहे,उदार ह्म॰ दातृत्व ज्याचें,रामोपि ह्म॰ असा जो राम तो ही, ३५ ७॥

तात्पर्य, राजा दशरथ स्वर्गलोकीं गेल्यानंतर आश्रित जन वसिष्ठ यांहीं ३२ बहुत प्रकारें भरताला सांगीतलें कीं हे भरता तूं राज्य कर॰ असें सर्वांहीं बोलले जरी तथापि,भरत राज्य करावयास न इच्छून वनांत गेला ३३ तेथें सत्यपराक्रमी रामचंद्र,यास भेटून सांगू लागला कीं, ३४ हे रामचंद्रा नीतिशास्त्र व धर्मशास्त्र तूंच जाणतेस असें सांगत असतां यशस्वी,व,परमेश्वर रामचंद्र ही ३५ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी० तोही पितुः ह्म० पित्याचा आदेशात् ह्म० आज्ञें करून राज्यं ह्म० राज्यातें नैच्छत् ह्म० नाहीं इच्छिता आला, अस्य ह्म० या भरतास महाबलः ह्म० मोठें आहे बल ह्म० सामर्थ्य ज्याचें व भरताग्रजः ह्म० भरताचा वडील बंधु रामः ह्म० रामचंद्र, राज्याय ह्म० राज्याचा रक्षणार्थ पादुके ह्म० पादुकातें, न्यासं ह्म० निधिरूपें करून, दत्वा ह्म० देऊन, ३६. टी० भरतं ह्म० भरतातें निवर्त्तयामास ह्म० परत पाठविलें, ततः ह्म० तदनंतर, सः ह्म० तो भरत, कामं ह्म० इच्छितातें, अनवाप्यैव ह्म० न च प्राप्त होऊन, रामपादौ ह्म० रामचंद्राचा पादातें, उपस्पृशन् ह्म० ग्रहण करीत होत्साता ३७ ७॥

नचैच्छत् पितुरादेशात् राज्यं रामो महाबलः पादुके चास्य राज्याय न्यासं दत्वा पुनः पुनः ३६
निवर्त्तयामास ततो भरतं भरताग्रजः स काममनवाप्यैव रामपादावुपस्पृशन् ३७ नंदि
ग्रामे करोद्राज्यं रामागमनकांक्षया गते तु भरते श्रीमान् सत्यसंधो जितेंद्रियः ३८

टी० नंदिग्रामे ह्म० नंदिग्रामाचे ठायीं, रामागमनकांक्षया ह्म० रामाचा परत येण्याची मार्गप्रतीक्षा करून, राज्यं ह्म० राज्यातें अकरोत् ह्म० करूं लागला, अनंतर भरते ह्म० भरत, गते ह्म० गेला असतां श्रीमान् ह्म० लक्ष्मीवान्, व, सत्यसंधः ह्म० सत्या, ह्म० खरी आहे संधा ह्म० प्रतिज्ञा ज्याची, व, जितेंद्रियः ह्म० आणें इंद्रियें जिंकिलीं आहेत. ३८ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

तात्पर्य, बापाचा आज्ञेमुळें राज्याचा अभिलाष केला नाहीं, राज्याचा रक्षणार्थ पादुका देऊन ३६ रामानें भरतास वाटे लावले तोही भरत आपलें इच्छित न पावून पादुका ग्रहण करीत होत्साता ३७ नंदिग्रामीं येऊन पुनः रामाचा परत येण्यां विषयीं मार्गप्रतीक्षा करून पादुका स्थापून भरत राज्य करूं लागला, तदनंतर इकडील वर्तमान तर सत्यप्रतिज्ञ व जितेंद्रिय ३८ ७॥

७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी० रामः ह्म० रामचंद्र जो तो, नागरस्य ह्म० नगरसंबंधीं, जनस्य च, ह्म० लोकांचे, च शब्दें करून भरताचे, आगमनं, ह्म० येणें पुनः होईल असें, आलक्ष्य ह्म० विचार करून दंडकान् ह्म० दंडकरण्यां प्रत, प्रविवेश ह ह्म० आता आला. ३९ टी० राजीवलोचनः ह्म० कमलासारिखे आहेत, लोचनें ह्म० नेत्रें ज्याचीं, रामः ह्म० असा राम, महारण्यं ह्म० मोठे वनाप्रत, प्रविश्य ह्म० जाऊन, विराधं ह्म० विराधनामक राक्षसातें हत्वा, ह्म० मारून, शरभंगं ह्म० शरभंगनामक ऋषीतें ददर्श ह्म० पाहता जाला ४० टी० सुतीक्ष्णं ह्म० सुतीक्ष्णनामक ऋषीतें, व, अगस्त्यं ह्म० अगस्त्य ऋषीतें, व, अगस्त्यभ्रातरं ह्म० अगस्त्याचा वंधू तें, पाहता जाला. नंतर, अगस्त्यवचनात् ह्म० अगस्त्याचा वचनें करून ऐंद्रं

रामस्तु पुनरालक्ष्य नागरस्य जनस्य च तत्रागमनमेकाग्रो दंडकान् प्रविवेश ह ३९ प्रविश्य तु महार
ण्यं रामो राजीवलोचनः विराधं राक्षसं हत्वा शरभंगं ददर्श ह ४० सुतीक्ष्णं चाप्यगस्त्यं च अगस्त्य
भ्रातरं तथा अगस्त्यवचनाच्चैव जग्राहैंद्रं शरासनं ४१ खड्गं च परमप्रीतस्तूणी चाक्षयसायकौ
वसतस्तस्य रामस्य वने वनचरैः सह ४२

ह्म० इंद्राचे, शरासनं ह्म० धनुष्यातें, जग्राह ह्म० ग्रहण केलें. ४१ टी० खड्गं ह्म० तरवारीतें तूणी ह्म० भाते, व, अक्षयसायक, ह्म० अक्षय बाणातें, परमप्रीतः ह्म० अतिसंतुष्ट होत्साता, घेतले वने ह्म० अरण्याचे ठायीं वनचरैः सह ह्म० वनचराचा बरोबरीने, वसतः ह्म० राहणार तस्य रामस्य ह्म० त्या रामचंद्राचा ४२

तात्पर्य, राम, प्रधानाचें, व, भरताचें पुनः येणें येथें होईल, तदनंतर त्याची समजूत करून वाटे लावणें, आश्रमाहून येथून च गेलेले बरें, अशी मसलत करून दंडक वनी गेला ३९ त्या दंडक वनीं रामचंद्र, विराधादिक राक्षसाला मारून, शरभंग ऋषीचा आश्रमीं गेला. ४० तेथें सुतीक्ष्ण, व, अगस्त्यादि ऋषींचें दर्शन घेतलें, तदनंतर अगस्त्य ऋषीपासून रामचंद्रानें इंद्राचें धनुष्य ग्रहण केलें. ४१ अक्षय भाते व खड्ग, आणि योग्य शस्त्रें व अस्त्रें याचाही संग्रह केला. ४२ ७॥ ७॥

टी॰ पंचवटीमध्यें रहाणार असे अक्रूर रक्षसां ह्म॰ असुर ह्म॰ दैत्य, रक्षसां ह्म॰ राक्षस, यांचा वधाय ह्म॰ मारण्यां करितां रामाची प्रार्थना करावी ह्मणून, सर्वे ह्म॰ संपूर्ण, ऋषयः ह्म॰ ऋषीजे, ते, अभ्यागमन् ह्म॰ येते जाले, तदा ह्म॰ त्याकाली, वने ह्म॰ वनाचे ठाईं, तेषां राक्षसानां ह्म॰ त्या राक्षसाचा मारणातें, सः ह्म॰ तो रामचंद्र प्रतिशुश्राव ह्म॰ अंगीकार करिता जाहला, ४३ टी॰ दंडकारण्यवासिनां ह्म॰ दंडकारण्याचे ठाईं रहाणार, व, अग्निकल्यानां ह्म॰ अग्नि सारिखे तेजस्वी, ऋषीनां ह्म॰ अशा ऋषी हीं, सांगीतला जे, संयति ह्म॰ युद्धाचे ठायीं, रक्षसां ह्म॰ राक्षसाचे, वधः ह्म॰ मारण, रामेण ह्म॰ रामानें, प्रतिज्ञातः ह्म॰ अंगीकारिलें, ४४ ॥ ॥ ॥ ॥

ऋषयोभ्यागमन्सर्वे वधाया क्रूररक्षसाम् स तेषां प्रतिशुश्राव रक्षसानां तदा वने ४३ प्रतिज्ञातश्च रामेण वधः संयति रक्षसाम् ऋषीणामग्निकल्पानां दंडकारण्यवासिनाम् ४४ तेन तत्रैव वसता जनस्थाननिवासिनी विरूपिता शूर्पणखा राक्षसी कामरूपिणी ४५ ॥

टी॰ जनस्थाननिवासिनी, जनस्थान ह्म॰ चवदा सहस्र राक्षस रहावयाचें स्थान, तेथें निवासिनी ह्म॰ राहणारी, कामरूपिणी ह्म॰ इच्छा सदृश वेष घेणारी, शूर्पणखा ह्म॰ सुपासारिखीं आहेत नखें जीचीं, अशी ती राक्षसी, तत्रैव ह्म॰ तेथेंच, वसता ह्म॰ राहणार, तेन ह्मण जे त्या रामचंद्रानें, विरूपिता ह्म॰ करूपित केली; ४५ ॥

तात्पर्य, त्याकाळीं सकल ऋषी येऊन रामचंद्राला आशिर्वाद दिल्यावर हे रामचंद्रा, या वनांत राक्षसांचा उपद्रव बहूत आहे, याजकरितां तूं याचा वध करावा, हें केल्यास आमचीं यज्ञयागादिक कर्मे यथास्थित होतील, असें सांगीतलें नंतर रामचंद्रानें ही ती गोष्ट अंगीकारिली ४३ व दंडकारण्याचे ठाईं वास करणार, अग्नी सारिखे तेजस्वी अशा ऋषी हीं कथिलें कीं, हे रामचंद्रा, युद्धाचे ठाईं या राक्षसाचें मारण तूं करावेंस, त्या रामचंद्रानें ही बरें आहे, असें स्वीकारिलें, ४४ व मनास येईल तसें स्वरूप घेणारी ती शूर्पणखा राक्षसी, रामचंद्रानें स्तननासिकाचा छेद करून कुरूपित केली, ४५ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, शूर्पणखा वाक्यात् ह्म॰ शूर्पणखेचा भाषणानें, उद्युक्तान् ह्म॰ तयार आलेले, सर्व राक्षसान् ह्म॰ संपूर्ण राक्षसातें, खरं ह्म॰ खर नामक, व, त्रिशिरसं ह्म॰ त्रिशिरा नामक, व, दूषणं ह्म॰ दूषण नामक राक्षसातें, ४६ टी॰ तस्मिन् वने ह्म॰ त्या वनाचे ठायीं, निवसतां ह्म॰ राहणार, व जनस्थान निवासिनां ह्म॰ पंचवटीचे ठायीं वास करणार, तेषां ह्म॰ त्या खरादि राक्षसाचे, पदानुगान् ह्म॰ सेवक जनातें: रामचंद्र, निजघान ह्म॰ मारिता जाला ४७ टी॰ रक्षसां ह्म॰ राक्षसांचीं सहस्राणि चतुर्दश ह्म॰ चवदा हजार, निहतानि ह्म॰ मारिले, आसन् ह्म॰ असते आले ततः ह्म॰ तदनंतर रावण जो तो, ज्ञातिवधं ह्म॰ स्वजातीचा मारणातें, श्रुत्वा ह्म॰ ऐकून, क्रोधमूर्च्छितः ह्म॰ क्रोधानें मूर्च्छित ह्म॰ व्याप्त जाहलेला, ४८ ॥

ततः शूर्पणखावाक्यादुद्युक्तान्सर्वराक्षसान् खरं त्रिशिरसं चैव दूषणं चैव राक्षसम् ४६ निजघान ततो रामस्तेषां चैव पदानुगान् वने तस्मिन्निवसतां जनस्थाननिवासिनाम् ४७ रक्षसां निहतान्यासन् सहस्राणि चतुर्दश ततो ज्ञातिवधं श्रुत्वा रावणः क्रोधमूर्च्छितः ४८ सहाय्यं वरयामास मारीचं नाम राक्षसम् वार्यमाणः सुबहुशो मारीचेन स रावणः ४९

टी॰ मारीचेन ह्म॰ मारीच राक्षसानें, बहुशः ह्म॰ बहूत प्रकारें, वार्यमाणः ह्म॰ नको असें बोधिलेला, सः रावणः ह्म॰ तो रावण, मारीच ह्म॰ मारीच नामक, राक्षसं ह्मणजे राक्षसातें सहाय्यं ह्मणजे मला तूं कुमक कर असें, वरयामास ह्म॰ मागूं लागला ४९ ॥ ॥ ॥

तात्पर्य, तदनंतर, शूर्पनखेनें सांगीतलें असें कीं हे खरादि राक्षस हो ! माझी अवस्था अशी रामचंद्रानें केली, हें ऐकून व पाहून तयार आहले, अशा राक्षसाला रामचंद्रानें मारिले, ४६ आणि पंचवटीमध्यें राहणार, त्याचा सेवकास मारिलें ४७ आणि तेथें एकंदर चवदा सहस्र राक्षस वधिले, तदनंतर, रावण आपल्या ज्ञातीचा वध ऐकून व क्रोधाविष्ट होऊन ४८ आणि मारीच नामक राक्षसाला सांगूं लागला कीं सीताहरण करण्यांविषयीं तूं मला कुमक कर ४९ ॥ ॥ ॥

टी॰ तेन बलवता ह्म॰ त्या बलिष्ठ रामचंद्राशीं, हे रावणा, ते ह्म॰ तुला, विरोधः ह्म॰ द्वेष जो तो, नक्षमः ह्म॰ नाहीं योग्य होय, तु ह्म॰ आणखी, तद्वाक्यं ह्म॰ त्या मारीच भाषणातें, अनादृत्य ह्म॰ अनादर करून, कालचोदितः ह्म॰ काळानें प्रेरित ५० टीका, सहमारीचः ह्मणजे मारीचा सहवर्तमान तो रावण, तस्य ह्म॰ त्या रामचंद्राचा, आश्रमपदं ह्म॰ आश्रमस्थानाप्रत, जगाम ह्म॰ गेला, तदा ह्म॰ त्या काळीं तेन मायाविना ह्म॰ त्या मायावी रावणानें, नृपात्मजौ ह्म॰ दशरथाचा पुत्रांतें, दूरं ह्म॰ दूर, अपवाह्य ह्म॰ घालवून, ५१ टी॰ जटायुषं ह्म॰ जटायू नामक, गृध्रं ह्म॰ गृध्रातें, हत्वा ह्म॰ मारून, रामस्य ह्म॰ रामाची, भार्या ह्म॰ सीतेतें जहार ह्म॰ हरण केलें, निहतं ह्म॰ मेलेल्या गृध्रं ह्म॰ गृध्रातें व दृष्ट्वा ह्म॰ पाहून, मैथिलीं

नविरोधोबलवताक्षमोरावणतेनते अनादृत्यतुतद्वाक्यंरावणःकालचोदितः ५० जगामसहमा
रीचस्तस्याश्रमपदंतदा तेनमायाविनादूरमपवाह्यनृपात्मजौ ५१ जहारभार्यांरामस्यगृध्रंह
त्वाजटायुषं गृध्रंचनिहतंदृष्ट्वाहृतांश्रुत्वाचमैथिलीं ५२

ह्म॰ सीतेतें हृतां ह्मणजे हरण केली, श्रुत्वा ह्मणजे श्रवण करून, ५२ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

तात्पर्य, नंतर मारीच बोलूं लागला कीं हे रावणा परस्त्री हरण करणें हा मोटा अधर्म आहे आणि विश्वामित्राचा यज्ञामध्यें त्या रामचंद्राचा पराक्रमाचा अनुभवही मी घेतला होता, त्यास्तव, रामचंद्राशीं विरोध तुला योग्य नव्हे असें सांगीतलें असतांही रावणानें मारीच राक्षसाचा भाषणाचा अनादर करून ५० त्याच वेळेस मारीचा सहवर्तमान रामचंद्राचा आश्रमास गेला, आणि, तेथें रावणानें काय केलें ह्मणाल तर, कनकमृगाचा मोहानें रामलक्ष्मणाला आश्रमापासून दूर घालऊन, ५१ जटायू नामक गृध्राशीं युध्द करून नंतर त्या गृध्राला अर्धा मेला असा केल्यावर सीता हरण केली, व रावणानें सीता नेली असतां इकडील मजकूर तर मृतप्राय जो जटायू त्याचा मुखापासून रावणानें जानकी नेली असें ऐकून, ५२. ७॥

टी॰ आकुलेंद्रियः ह्म॰ व्याकुळ जालीं आहेत इंद्रियें ज्याचीं, आणि, शोकसंतप्त ह्म॰ शोकानें संतप्त, असा राघव, विललाप ह्म॰ विलाप करूं लागला, ततः ह्म॰ तदनंतर तेनैव शोकेन ह्म॰ त्याच शोकें करून, गृध्रं दग्ध्वा ह्म॰ गृध्रास जाळून, ५३ टी॰ वने ह्म॰ वनाचे ठायीं, सीतां ह्म॰ सीतेतें, मार्गमाणः ह्म॰ धुंडकणार, असा रामचंद्र, घोरदर्शनं ह्म॰ भयंकर आहे दर्शन ज्याचें, रूपेण ह्म॰ स्वरूपानें विकारं ह्म॰ विकारयुक्त, कबंधं ह्म॰ कबंधनामक राक्षसातें, ददर्श ह ह्म॰ पाहता आहला, ५४ टी॰ महाबाहुः ह्म॰ मोटा पराक्रमी, तो राम, तं निहत्य ह्म॰ त्या कबंधातें मारून ददाह ह्म॰ दहन करिता जाला, नंतर सः ह्म॰ तो कबंध, स्वर्गतः ह्म॰ स्वर्गलोकीं गेला व स्तो गंधर्वदेही पावलेला, अस्य ह्म॰ या रामचंद्रास, कथयामास ह्म॰ कथन करूं लागला, हे रामचंद्रा धर्मचारिणीं ह्म॰ उत्तम धर्म आचरण करणारी, शबरीं ह्म॰ भिल्लीण ५५ टी॰ धर्मनिपुणां ह्म॰ धर्माचे ठायीं शहाणी, श्रमणीं ह्म॰ श्रमणा या नावाची, तिजप्रत, राघव ह्म॰ हे रामचंद्रा अभिगच्छ ह्म॰ जा, इति ह्म॰ या प्रकारें करून, त्या गंधर्वानें रामाला सांगीतलें नंतर, शत्रुसूदनः ह्म॰ शत्रूंचा नाशकर्ता, व महातेजाः ह्म॰ मोटा तेजस्वी सः ह्म॰ तो राम, शबरीं ह्म॰ शबरीप्रत, अभ्यगच्छत् जाता आहला, ५६ ७॥ ७॥ ७॥

राघवःशोकसंतप्तोविललापाकुलेंद्रियः ततस्तेनैवशोकेनगृध्रंदग्ध्वाजटायुषम् ५३ मार्गमाणो
वनेसीतांराक्षसंसंददर्शह कबधनामरूपेणविकृतंघोरदर्शनम् ५४ तंनिहत्यमहाबाहुर्ददा
हस्वर्गतश्चसः सचास्यकथयामासशबरींधर्मचारिणीम् ५५ श्रमणींधर्मनिपुणामभिगच्छे
तिराघव सोऽभ्यगच्छन्महातेजाशबरींशत्रुसूदनः ५६

तात्पर्य, शोकानें संतप्त रामचंद्र विलाप करूं लागला, व त्या जटायूला जाळून, ५३ पुढें जात असतां भयंकर कबंध राक्षसाला पाहिलें, ५४ त्या कबंधाला मारून जात असतां गंधर्वदेहीं पावलेला तो कबंध रामास सांगूं लागला, ५५ कीं, हे रामचंद्रा तूं शबरीचा आश्रमीं जा; तदनंतर, तो रामचंद्र, नानाविध फलपुष्प वृक्षांहीं युक्त अशा, तिचा आश्रमीं गेला, ५६ ७॥ ७॥ ७॥
७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी० वद्दशरथात्मजः ह्म० दशरथाचा पुत्र राम, शबर्या ह्म० शबरीनें, सम्यक् ह्म० उत्तम प्रकारें करून, पूजितः ह्म० सत्कार केलेला, पंपातीरे ह्म० पंपानामक सरोवराचे ठायीं, हनुमता ह्म० हनुमान् याना वाचा, वानरेण ह्म० वानराशीं, संगतः ह्म० मिळाला ५७ टी० हनुमद्वचनात् ह्म० हनुमंताचा वाक्यें करून महाबलः ह्म० मोठा बलिष्ट जो राम तो, सुग्रीवेण ह्म० सुग्रीवाशीं, संगतः ह्म० मिळाला, सुग्रीवाय ह्म० सुग्रीवा कारणें, तत् ह्म० तें, सर्वं ह्म० संपूर्ण, शंसत् ह्म० कथन करूं लागला, ५८ टी० रामस्य ह्म० रामचंद्राचें, आदितः ह्म० मुळापासून, यथावृत्तं ह्म० असे जाहलें तें, आणि, विशेषतः ह्म० विशेषें करून, सीतायाः ह्म० सीतेचें ही जालेलें वृत्त, यातें, सुग्रीव वानरः ह्म० सुग्रीव नामक वान

शबर्या पूजितः सम्यक् रामो दशरथात्मजः पंपातीरे हनुमता संगतो वानरेण ह ५७ हनुमद्वचनाच्चैव सुग्रीवेण समागतः सुग्रीवाय च तत्सर्वं शंसद्रामो महाबलः ५८ आदितस्तद्यथावृत्तं सीतायाश्च विशेषतः सुग्रीवश्चापि तत्सर्वं श्रुत्वा रामस्य वानरः ५९ चकार सख्यं रामेण प्रीतश्चैवाग्निसाक्षिकम् ततो वानरराजेन वैरानुकथनं प्रति ६० ७॥

र तत् सर्वं ह्म० तें संपूर्ण श्रुत्वा ह्म० ऐकून ५९ टी० प्रीतः ह्म० संतुष्ट आलेला, असा तो वानर रामेण ह्म० रामाशीं अग्निसाक्षिकं ह्म० अग्नि आहे प्रत्यक्ष जास अशा सख्यं ह्म० सख्या तें चकार ह्म० करिता जाला, ततः ह्म० तदनंतर वानरराजेन ह्म० सुग्रीवानें, वैरानुकथनं ह्म० वाळीचें आणि आपलें द्वेषकारण, ६०

तात्पर्य, मग, त्या शबरीनें, यथाविधि, व, प्रीतीनें पूजित रामचंद्र, पंपातीरीं हनुमंताला भेटला ५७ व, नंतर हनुमंतानें सांगीतलें कीं, हे रामचंद्रा, तूं सुग्रीवाचें कार्य केल्यास तुझा ही कार्याचा उपयोगीं पडेल, असें बोलल्यावर सुग्रीवाशीं सख्य केलें, आणि, सुग्रीवास सकल आपला वृत्तांत रामचंद्रानें कळविला ५८ तदनंतर, मुळापासून रामचंद्राचा, व, सीतेचा, मजकूर सुग्रीवानें ऐकून ५९ रामचंद्राशीं अग्निसाक्षीनें सख्य केलें, त्यावर सुग्रीवानें ही वालीचें व आपलें वैरकारण, ६० ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी० प्रणयात् ह्म० प्रीतीनें, रामाय ह्म० रामचंद्राकारणें, सर्वं ह्म० संपूर्ण, आवेदितं ह्म० सांगीतलें, तदा ह्म० त्याकालीं, वालिवधं ह्म० वालिचा वधाप्रत, रामेण ह्म० रामचंद्रानें, प्रतिज्ञातं ह्म० अंगीकारिलें ६१ टी० वालिनः ह्म० वालीचें, बलं ह्म० सामर्थ्यातें, सुग्रीव वानरः ह्म० सुग्रीव नामक वानर, रामास, कथयामास ह्म० सांगूं लागला, वीर्येण ह्म० पराक्रमें करून युक्त, व राघवे ह्म० अशा रामाचे ठायीं सुग्रीव जो, तो, शंकितः ह्म० शंकायुक्त, आसीत् ह्म० असता जाहला, ६२ टी० राघवप्रत्ययार्थं ह्म० रामचंद्राचें सामर्थ्य किती आहे याची खातरी आपणास जाहली पाहिजे ह्मणून, दुंदुभेः ह्म० दुंदुभी नामक राक्षसाचा उत्तमं ह्म० चांगला, व महापर्वतसंनिभं ह्म० मोठ्या पर्वतासारिखा, कायं ह्म० देहातें सुग्रीव जो तो, दर्शयामास ह्म० दाखविता जाला ६३॥ टी० नंतर, महाबाहुः ह्म० मोठा पराक्रमी, व महाबलः ह्म० मोठें आहे सामर्थ्य जाचें, तो राम, त्या देहाला, प्रेक्ष्य ह्म० पाहून, व उत्स्मयित्वा ह्म० स्वल्प हास्य करून, पादांगुष्ठेन ह्म० पायाचा अंगठ्यानें, संपूर्णं ह्म० परिपूर्ण, दशयोजनं ह्म० चाळीस कोशपर्यंत, चिक्षेप ह्म० टाकिता जाहला ६४ ७॥ ७॥ ७॥

रामायावेदितं सर्वं प्रणयाद्दुःखितेन च प्रतिज्ञातं च रामेण तदा वालिवधं प्रति ६१ वालिनश्च बलं तत्र कथयामास वानरः सुग्रीवः शंकितश्चासीत्तन्नित्यं वीर्येण राघवे ६२ राघवप्रत्ययार्थं तु दुंदुभेः कायमुत्तमं दर्शयामास सुग्रीवो महापर्वतसन्निभम् ६३ उत्स्मयित्वा महाबाहुः प्रेक्ष्य चास्थि महाबलः पादांगुष्ठेन चिक्षेप संपूर्णं दशयोजनम् ६४

तात्पर्य, रामास प्रीतीनें कथन केलें, व, त्या रामानें ही वालीचा वध करीन हें स्वीकारिलें ६१ परंतु, सुग्रीवाचा मनांत अशी शंका आली कीं, अरुणोदय झाल्यावर सूर्योदयाचा आंत रावणाला कक्षेत धरून चतुःसमुद्रांचें उल्लंघन वालीकरितो, असें सामर्थ्य या रामाला आहे किंवा नाहीं, या करितां सुग्रीव ६२ मोठ्या पर्वतासारिखा, दुंदुभी नामक राक्षसाचा देह दाखविता झाला. कशाकरितां? असें ह्मणाल तर, रामानें त्यास फेकून द्यावें, ह्मणजे आपणास खातरी वाटेल ६३ नंतर त्या मोठ्या बळकट रामानें स्वल्प हास्य करून आणि, त्या राक्षसाचें अस्थिपंजर पायाचा अंगठ्यानें चाळीस कोशपर्यंत फेकून दिल्हे ६४ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी॰ पुनः ह्म॰ आणखी, तदा ह्म॰ त्याकाली सकळ लोकांस, प्रत्ययं ह्म॰ विश्वास, जनयन् ह्म॰ उत्पन्न करणार, तो राम, एकेन महेषुणा ह्म॰ एका बाणानें, सप्त तालान् ह्म॰ सात ताल वृक्षातें, गिरिं ह्म॰ पर्वतातें, रसातलं ह्म॰ रसातला प्रत, बिभेद ह्म॰ भेदन करिता झाला, ६५ टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, तेन ह्म॰ त्या आश्चर्यकारक कर्मानें प्रीतमनाः ह्म॰ संतुष्ट आहे मन ज्याचें, व, विश्वस्तः ह्म॰ हा राम बळकट, व, चातुर्ययुक्त, व, पराक्रमी ही आहे, असा विश्वास पावलेला, सः महाकपिः ह्म॰ तो मोठा सुग्रीव, रामसहितः ह्म॰ रामाशीं युक्त होत्साता. किष्किंधां गुहां ह्म॰ किष्किंधा नामक गुहे प्रत, जगाम ह्म॰ गेला, ६६ टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, हरिवरः ह्म॰ कपिश्रेष्ठ, व,

बिभेद च पुनस्तालान् सप्तैकेन महेषुणा गिरिं रसातलं चैव जनयन् प्रत्ययं तदा ६५ ततः प्रीतमनास्तेन विश्वस्तः स महाकपिः किष्किंधां रामसहितो जगाम च गुहां तदा ६६ ततो गर्जद्धरिवरः सुग्रीवो हेमपिंगलः तेन नादेन महता निर्जगाम हरीश्वरः ६७ अनुमान्य तदा तारां सुग्रीवेण समागतः निजघान च तत्रैनं शरेणैकेन राघवः ६८

अपिंगलः ह्म॰ माझा रंग वर्ण पिंगट नाहीं, मी सुग्रीव आहें, असें ह्मणून तो गर्जना करूं लागला, तेन महता नादेन ह्म॰ त्या मोठ्या शब्दानें हरीश्वरः ह्म॰ जो कपिश्रेष्ठ वाली तो, निर्जगाम ह्म॰ आला झाहला, ६७ तदा ह्म॰ त्याकालीं, तारां ह्म॰ तारेतें, अनुमान्य ह्म॰ समजूत करून, सुग्रीवेण ह्म॰ सुग्रीवाशीं, समागतः ह्म॰ मिळालेला तो, राघव, ह्म॰ रामचंद्र जो तो, एकेन शरेण ह्म॰ एका बाणेंकरून एनं ह्म॰ वालीतें, निजघान ह्म॰ मारिता झाला ६८

तात्पर्य, एकाच बाणानें एकदांच सात ताल वृक्षास भेदन करून, व, पर्वतास ही रसातलीं पाठविले ६५ व त्या आश्चर्य कर्मानें संतुष्ट होऊन, व, विश्वास पावलेला असा सुग्रीव, रामाला बरोबर घेऊन किष्किंधा प्रत गेला ६६ व मी सुग्रीव, व, कपिश्रेष्ठ आहें, अशा वीरनादानें तो सुग्रीव मोठ्यानें गर्जना करूं लागला, नंतर, त्या वीरनादानें कपिश्रेष्ठ वाली जो, तो, घरांतून बाहेर निघाला ६७ व त्या कालीं तारेची समजूत करून सुग्रीवाशीं युद्ध करित असतां रामानें एका बाणें करून वालीला मारिलें ६८ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, सुग्रीव वचनात् ह्म॰ सुग्रीवाचा वाक्यें करून, आहवे ह्म॰ युद्धाचे ठायीं वालिनं ह्म॰ वालीतें, हत्वा ह्म॰ मारून, राघव, ह्म॰ रामचंद्र जो तो, सुग्रीवमेव ह्म॰ सुग्रीवातेंच तद्राज्ये ह्म॰ त्या वालीचा राज्याचे ठायीं प्रत्यपादयत् ह्म॰ स्थापिता झाला ६९ टी॰ सः ह्म॰ तो, वानरर्षभः ह्म॰ वानरश्रेष्ठ सुग्रीव जो तो, सर्वान् ह्म॰ संपूर्ण, वानरान् ह्म॰ वानरातें, समानीय ह्म॰ बोलावून, जनकात्मजां ह्म॰ सीतेतें, दिदृक्षुः ह्म॰ पहावयाकारणें इच्छिणार असा होत्साता, दिशः ह्म॰ चारी दिशेतें, प्रस्थापयामास ह्म॰ पाठविता जाहला, ७० टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, संपातेः ह्म॰ संपाती नामक, गृध्रस्य ह्म॰ गृध्राचा, वचनात् ह्म॰ वाक्यें करून बली ह्म॰ बळकट असा हनुमान् जो, तो, शतयोजनविस्तीर्णं ह्म॰ चारशें कोशपर्यंत रुंद असा, लवणार्णवं ह्म॰ क्षार समुद्रातें, पुप्लुवे ह्म॰ उड्डाण करिता झाला, ७१ टी॰ तत्र ह्म॰ तेथें, रावणपालितां ह्म॰ रावणानें रक्षित, लंकां ह्म॰ लंका नामक, पुरीं ह्म॰ नगरीतें, तो हनुमान् आसाद्य ह्म॰ जाऊन, अशोकवनिकां ह्म॰ अशोकवनिके प्रत, गतां ह्म॰ राहणारी, व, ध्यायंतीं ह्म॰ रामाचें ध्यान करणारी, अशा, सीतां ह्म॰ सीतेस, ददर्श ह्म॰ पाहता झाला ७२ ७॥ ७॥

ततः सुग्रीववचनात् हत्वा वालिनमाहवे सुग्रीवमेव तद्राज्ये राघवः प्रत्यपादयत् ६९ स च सर्वान् समानीय वानरान् वानरर्षभः दिशः प्रस्थापयामास दिदृक्षुर्जनकात्मजाम् ७० ततो गृध्रस्य वचनात् संपातेर्हनुमान् बली शतयोजनविस्तीर्णं पुप्लुवे लवणार्णवं ७१ तत्र लंकां समासाद्य पुरीं रावणपालिताम् ददर्श सीतां ध्यायंतीमशोकवनिकां गतां ७२

तात्पर्य, तदनंतर, सुग्रीवास राज्याभिषेक रामचंद्रानें केला, ६९ व त्यावेळेस सीतेचा शोध करावा ह्मणून सुग्रीवानें सकळ वानरांस बोलाऊन चहूंकडे पाठविले, ७० व, समुद्रतीरीं नळनीळ इत्यादिक मंडळी बोलत असतां त्यावेळेस संपातीनें सांगीतलें कीं, रावणानें सीतेस नेऊन अशोकवनांत ठेविली आहे, तें ऐकून संतोषानें मारुती समुद्रावरून उड्डाण करिता झाला ७१ व नंतर लंकेमध्यें मारुती जाऊन रामाचें ध्यान करणार, अशा सीतेस पाहून, ७२ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

टी॰ अभिज्ञानं ह्म॰ मुद्रिकारूप खूण, निवेदयित्वा ह्म॰ सांगून, चपरं ह्म॰ आणिखी, प्रवृत्तिं ह्म॰ रामसुग्रीवाचे सख्यादिकांतें, निवेद्य ह्म॰ कथन करून, चपरं ह्म॰ आणिखी, वैदेहीं ह्म॰ सीतेतें, समाश्वास्य ह्म॰ आश्वासन करून, तोरणं ह्म॰ अशोकवनिकेच्या पुढील दरवाजा यातें, व, च, या अव्ययें करून सीतेचें स्थान सोडून अशोकवनाचाही, मर्दयामास ह्म॰ भंग करिता झाला ७३ टी॰ पंचसेनाग्रगान् ह्म॰ पिंगलनेत्र आदिकरून, पांच सेनेचा स्वामीतें, व, सप्तमंत्रिसुतानपि ह्म॰ जंबुमाल्यादि सात प्रधानाचा पुत्रातें ही हत्वा ह्म॰ मारून, शूरं ह्म॰ पराक्रमी, अशा अक्षं ह्म॰ रावणपुत्रातें ही, निष्पिष्य ह्म॰ चूर्ण करून, ग्रहणं ह्म॰ इंद्रजितानें ब्रह्मास्त्रें करून केलें जें बंधन यातें, समुपागमत् ह्म॰ पावता झाला, ७४

निवेदयित्वाभिज्ञानं प्रवृत्तिंच निवेद्य च समाश्वास्य च वैदेहीं मर्दयामास तोरणम् ७३ पंचसेनाग्रगान् हत्वा सप्तमंत्रिसुतानपि शूरमक्षंच निष्पिष्य ग्रहणं समुपागमत् ७४ अस्त्रेणोन्मुक्तमात्मानं ज्ञात्वा पैतामहाद्वरात् मर्षयन् राक्षसान् वीरो मंत्रिणस्तान् यदृच्छया ७५ ततो दग्ध्वा पुरीं लंकामृते सीतांच मैथिलीम् रामाय प्रियमाख्यातुं पुनरायान्महाकपिः ७६

टी॰ अस्त्रेण ह्म॰ अस्त्रें करून, उन्मुक्तं ह्म॰ सुटलेला अशा, आत्मानं ह्म॰ आपणातें, ज्ञात्वा ह्म॰ आणून, पैतामहात् वरात् ह्म॰ ब्रह्मदेवाच्या वरें करून, तान्मंत्रिणः ह्म॰ त्या मंत्रीतें, व, राक्षसान् ह्म॰ राक्षसातें, यदृच्छया ह्म॰ स्वेच्छे करून, मर्षयन् ह्म॰ सोशीत होत्साता रावणाच्याजवळ गेला ७५ टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, मैथिलीं ह्म॰ मिथिलदेशांत प्रगट जालेली अशा, सीतां ऋते ह्म॰ सीते वांचून, लंकापुरीं ह्म॰ लंकानगरीतें दग्ध्वा ह्म॰ जाळून, रामाय ह्म॰ रामाकारणें, प्रियं ह्म॰ सीतेचें दर्शन घेतलें, ही गोष्ट आख्यातुं ह्म॰ सांगावयास, पुनः ह्म॰ आणखी, महान् ह्म॰ मोठा जो, कपिः ह्म॰ मारुती, तो, आयात् ह्म॰ येता झाला ७६ ता॰ व भाषण करूं लागला कीं, रामानें ही मुद्रिका दिली आहे, व सुग्रीव व राम, या उभयतांची मैत्री झाली, असें सांगून व अशोकवनाचा मोठा दरवाजा होता, तो, मारुतीनें मोडून टाकिला ७३ व सेनेचे स्वामी, व, जंबुमाल्यादि प्रधानाचे पुत्र, व रावणाचा पुत्र अक्ष, यातें मारिता झाला ७४ इंद्रजितानें ब्रह्मास्त्रें करून त्या मारुतीस बंधन केलें, ७४ त्या मारुतीला, रावणास पहावयाची इच्छा होती ह्मणून बंधनातें सहन करीत होत्साता रावणाजवळ गेला ७५ व सीतेचा स्थला वांचून लंका जाळून रामास कुशल वर्तमान सांगावें, या करितां तो मारुती माघारें येता जाला ७६

टी॰ सः ह्म॰ तो मारुती जो तो, अभिगम्य ह्म॰ जाऊन, महात्मानं ह्म॰ परमात्मा अशा, रामं ह्म॰ रामातें, प्रदक्षिणं कृत्वा ह्म॰ प्रदक्षिणा करून, असे याला ह्म॰ अविनाश आहे, बल, व, बुद्धि, व धैर्यादि ऐश्वर्य ज्याचें असा होत्साता, सीता दृष्टा ह्म॰ सीता पाहिली, असें तत्त्वतः ह्म॰ निश्चयें करून, न्यवेदयत् ह्म॰ सांगूं लागला ७७ टी॰ ततः ह्म॰ तदनंतर, सुग्रीवसहितः ह्म॰ सुग्रीवें करून युक्त राम जो तो, महोदधेः ह्म॰ समुद्राचा, तीरं ह्म॰ तीराप्रत, गत्वा ह्म॰ जाऊन, आदित्यसन्निभैः ह्म॰ सूर्यासारिखे तेजस्वी अशा, शरैः ह्म॰ बाणाहीं करून, समुद्रं ह्म॰ समुद्रातें, क्षोभयामास ह्म॰ व्याकुळ करिता जाहला ७८

सोभिगम्य महात्मानं कृत्वा रामं प्रदक्षिणं न्यवेदयदमेयात्मा दृष्टा सीतेति तत्त्वतः ७७ ततः सुग्रीवसहितो गत्वा तीरं महोदधेः समुद्रं क्षोभयामास शरैरादित्यसंनिभैः ७८ दर्शयामास चात्मानं समुद्रः सरितां पतिः समुद्रवचनाच्चैव नलः सेतुमकारयत् ७९

टी॰ सरितांपतिः ह्म॰ नद्यांचा स्वामी, असा समुद्रः ह्म॰ समुद्र जो तो, आत्मानं ह्म॰ आपणातें, दर्शयामास ह्म॰ दाखविता जाहला, चपरं ह्म॰ आणिखी, समुद्रवचनात् ह्म॰ समुद्राच्या वचनें करून, नलः ह्म॰ नल जो तो, सेतुं ह्म॰ सेतूतें, अकारयत् ह्म॰ णजे करिता जाहला, ७९ ॥

तात्पर्य, तदनंतर, मारुतीनें रामचंद्राला नमस्कार करून, व, प्रदक्षिणा घालून खुशालीचें वर्तमान सांगीतलें ७७ त्यावर, सुग्रीवाशीं युक्त अशा रामचंद्रानें समुद्रतीरीं जाऊन अग्न्यस्त्राचा प्रयोगानें समुद्राला घाबरें केलें ७८ तदनंतर, सुवर्णपात्रामध्यें हीरकादिरत्ने घेऊन तो समुद्र रामचंद्राला प्रत्यक्ष होऊन बोलिला कीं हे रामचंद्रा तूं नलाकडून सेतू बांधवावा, असें समुद्रानें सांगीतल्यावर रामचंद्रानें ही नलाकडून सेतू बांधविला ७९ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

टी० तेनह्म० त्यासेतुकरून,लंकापुरींह्म० लंकानामकनगरीतें,गत्वाह्म० आऊन,आहवेह्म० युध्दाचेठायीं,रावणं ह्म० रावणातें,हत्वाह्म० मारून,रामः ह्म० रामचंद्र जोतो,सीतां ह्म० सीतेतें,अनुप्राप्य ह्म० प्राप्त होऊन,परां ह्म० उत्कृष्ट व्रीडां ह्म० लज्जेप्रत,उपागमत् ह्म० पावता जाहला ८० टी० ततः ह्म० तदनंतर,जनसंसदि ह्म० वानर राक्षसउसभे चे ठायीं,परुषं ह्म० कठोर भाषणातें,रामः ह्म० रामचंद्र जो तो,सीतां ह्म० सीतेप्रत,उवाच ह्म० बोलता जाला,नंतर सती ह्म० पतिव्रता,आणि,अमृष्यमाणा ह्म० त्या भाषणातें,न सहन करणारी,सासीता ह्म० असी ती सीता जी ती,ज्वलनं ह्म० अग्नीप्रत,विवेश ह्म० प्रवेश करिती जाहली. ८१ ॥

तेनगत्वापुरींलंकांहत्वारावणमाहवे रामःसीतामनुप्राप्य परांव्रीडामुपागमत् ८० तामुवाचततोरामःपरुषंजनसंसदि अमृष्यमाणासासीताविवेशज्वलनंसती ८१ ततोग्निवचनात्सीतांज्ञात्वाविगतकल्मषाम् कर्मणातेनमहतात्रैलोक्यंसचराचरम् ८२

टी० ततः ह्म० तदनंतर,अग्निवचनात् ह्म० अग्नीचा वाक्येंकरून,विगतकल्मषां ह्म० पापरहित अशा,सीतां ह्म० सीतेतें,ज्ञात्वा ह्म० जाणून,ग्रहण करिता जाहला,महता ह्म० मोटें,तेन कर्मणा ह्मणजे सीतेचें शुध्दिरूप कर्मानें,सचराचरं ह्म० स्थावर जंगमानें युक्त ८२ ॥ तात्पर्य,त्यासेतुकरून लंकेंत आऊन रावणास राम मारिता जाला,नंतर सीतेचें ग्रहण केल्यावर परम लज्जेप्रत पावला ८० नंतर,सीतेस रामचंद्र सभेचे ठायीं कठोर भाषण करूं लागला कीं,"दर्शोनेत्रातुरस्येव प्रतिकूलासि मेदृढम्" ह्म० नेत्ररोगानें पीडित जनास असा दृष्टी प्रतिकूल असतात त्याप्रमाणें मला तूं प्रतिकूल आहेस,असें बोलल्यावर सीतेनें अग्नीमध्यें प्रवेश केला ८१ त्यावर अग्नीनें येऊन सांगीतलें कीं,ही सीता पापरहित आहे. हे रामा त्वं इला ग्रहण कर. असें अग्नीनें कथन केल्यावर तो राम सीतेला ग्रहण करिता जाला त्या अग्निप्रवेशरूप महत्कर्मानें सचराचर त्रैलोक्य ८२ ॥ ॥ ॥ ॥

स्वर्गमृत्युपाताल हे लोकत्रय जें
टी० सदेवर्षिगणं ह्म० देवसमुदाय,व,ऋषिसमुदाय,येणेंकरून सहित असें जें त्रैलोक्यं ह्म० स्वर्गमृत्युपाताल हे लोकत्रय जें तें,महात्मनः ह्म० परमात्मा,असा राघवस्य ह्म० रामाचें,तुष्टं ह्म० स्तवन करितें झाले,नंतर,सर्वदेवतैः ह्म० सकल देवतेनीं,पूजितः ह्म० सत्कार केलेला,आणि,प्रहृष्टः ह्म० संतोष पावलेला,जो रामः ह्म० रामचंद्र तो,बभौ ह्म० शोभता जाला ८३ टी० लंकायां ह्म० लंकेचे ठायीं,राक्षसेंद्रं ह्म० राक्षसांचा स्वामी असा,विभीषणं ह्म० विभीषणातें,अभिषिच्य ह्म० पट्टाभिषेक करून कृतकृत्यः ह्म० पूर्वीं अंगीकारिलें होतें कीं,विभीषणास राज्याभिषेकरूप कार्य करीन,तें कार्य जाणें केलें असा,व,विज्वरः

सदेवर्षिगणंतुष्टंराघवस्यमहात्मनः बभौरामःसंप्रहृष्टःपूजितःसर्वदेवतैः ८३ अभिषिच्यचलंकायांराक्षसेंद्रंविभीषणम् कृतकृत्यस्तदारामोविज्वरःप्रमुमोदह ८४ देवताभ्योवरंप्राप्यसमुत्थाप्यचवानरान् अयोध्यांप्रस्थितोरामःपुष्पकेणसुहृद्वृतः ८५

ह्म० अवश्यकर्त्तव्य चिंताताप गेला आहे ज्याचा असा,तो राम प्रमुमोद ह्म० संतोष पावता झाला,८४ टी० देवताभ्यः ह्म० देवतापासून,वरं ह्म० वराप्रत,प्राप्य ह्म० प्राप्त होवून,चपरं ह्म० आणिखी,वानरान् ह्म० वानरातें,समुत्थाप्य ह्म० निजून जसें उठावें त्याप्रमाणें उठवून,सुहृद्वृतः ह्म० विभीषणादिक मित्राहीं युक्त,असा,रामः ह्म० रामजो तो,पुष्पकेण ह्म० पुष्पक विमानें करून,अयोध्यां ह्म० अयोध्येप्रत,प्रस्थितः ह्म० जाता झाला,८५
तात्पर्य,नंतर,देव,व,ऋषिगण येणेंकरून,सहित त्रैलोक्य जें,तें,रामाचें स्तवन करितें झालें,नंतर सकल देवताहीं पूजित रामचंद्र शोभूं लागला,८३ नंतर,लंकेचे ठायीं विभीषणास राज्याभिषेक करून रामचंद्र कृतकृत्य जाहाला ८४ व,त्यावर निजून जसें उठावें,त्याप्रमाणें सकल मृत वानर उठतील,असें देवांहीं वर दिल्हे. मग रामचंद्रानें ही सकल वानरांस उठवून आपल्या मित्राशीं युक्त होत्साता पुष्पक विमानांत बसून निघाला ८५ ॥

टी॰ सत्यपराक्रमः ह्म॰ खरें आहे शूरत्व ज्याचें असा, रामः ह्म॰ रामचंद्र जो तो, भरद्वाजाश्रमं ह्म॰ भरद्वाजाचा आश्रमाप्रत, गत्वा ह्म॰ जाऊन, भरतस्य ह्म॰ भरताचा, अंतिकं ह्म॰ समीपभागाप्रत. हनुमंतं ह्म॰ मारुतीतें, व्यसर्जयत् ह्म॰ पाठविता झाला ८६ टी॰ पुनः ह्म॰ आणखी, तत्पुष्पकं ह्म॰ त्या पुष्पकविमानातें, आरुह्य ह्म॰ आरोहण करून, सुग्रीवसहितः ह्म॰ सुग्रीवाशीं युक्त, असा राम जो तो, आख्यायिकां ह्म॰ कथेतें, जल्पन् ह्म॰ भाषण करीत होत्साता, नंदिग्रामं ह्म॰ णजे नंदिग्रामाप्रत. तदा ह्मणजे त्या काळीं, ययौ ह्मणजे जाता जाहाला ८७ ७॥

भरद्वाजाश्रमं गत्वा रामः सत्यपराक्रमः भरतस्यांतिकं रामो हनुमंतं व्यसर्जयत् ८६ पुनराख्यायिकां जल्पन् सुग्रीवसहितस्तदा पुष्पकं तत्समारुह्य नंदिग्रामं ययौ तदा ८७ नंदिग्रामे जटां हित्वा भ्रातृभिः सहितोनघः रामः सीतामनुप्राप्य राज्यं पुनरवाप्तवान् ८८

टी॰ नंदिग्रामे ह्म॰ नंदिग्रामाचे ठायीं, भ्रातृभिः सहितः ह्मणजे बंधुसहवर्तमान, जटां ह्मणजे जटेतें, हित्वा ह्म॰ टाकून, अनघः ह्म॰ पापरहित, असा, रामः ह्मणजे, रामचंद्र जो तो, सीतां ह्म॰ सीतेतें, अनुप्राप्य ह्म॰ प्राप्त होऊन, पुनः ह्मणजे आणखी, राज्यं ह्मणजे, राज्याप्रत, अवाप्तवान् ह्म॰ पावता झाला ८८ ७॥

तात्पर्य, चौदा वर्षें पूर्ण जाल्यावर तूं माझा दृष्टीस न पडसील तर मी अग्नीमध्यें प्रवेश करीन असी भरतानें प्रतिज्ञा केली होती, त्याकरितां रामानीं भरद्वाजाचा आश्रमीं जाताक्षणीं मारुतीस भरतासमीप पाठविला, किंवा दुसरा हेतु हा कीं, मोठ्या वानरसेनेंकरून अकस्मात् आपलें जाणें जाल्यास भरतादिकांस विलक्षण शंका न व्हावी एतदर्थ मारुतीस पुढें लाऊन दिल्हे ८६ व पुष्पकविमानारूढ होऊन पूर्वीं जालेल्या जा गोष्टी त्या सुग्रीवादिकांस राम कथन करीत होत्साता नंदिग्रामीं गेला ८७ व नंदिग्रामीं सर्वांनी व्रतप्रयुक्त जटा बांधिल्या होत्या, त्या, तेथें टाकून सीतेसह योग्य वेष धरून आपल्या राज्यांत येता झाला ८८ ७॥ ७॥ ७॥ ७। ७॥

टी॰ प्रहृष्टमुदितः ह्म॰ स्वकीय पुत्र पश्वादि संपत्तीकरून, व, क्रुशत्वादि क्षोभरहितत्वेंकरून संतुष्ट आहे अंतःकरण ज्याचें, व, तुष्टः ह्म॰ रामचंद्राचा बहु दानेंकरून संसारसंबंधीं, व, दर्शनध्यानादिकेंकरून परलोक, या उभयतांचा लाभ होतो ह्मणून तुष्ट असें ह्मटलें आहे, आणि, पुष्टः ह्म॰ दरिद्र कर्मरहित, व, सुधार्मिकः ह्म॰ उत्तम आहे धर्म ज्याचा, व, निरामयः ह्म॰ मनःपीडारहित, अरोगः ह्म॰ देहजन्य व्याधिरहित, च परं ह्म॰ आणखी, दुर्भिक्षभयवर्जितः ह्म॰ दुर्भिक्ष, व, चोरादि भयानें रहित, असा लोक ह्म॰ जन जो तो होईल, ८९ टी॰ केचित् पुरुषाः ह्म॰ कोणतेही पुरुष जे, ते, पुत्रमरणं ह्म॰ पुत्राचा मरणातें, कचित् ह्म॰ कधींही न द्रक्ष्यंति ह्म॰ पाहणार नाहींत

प्रहृष्टमुदितो लोकस्तुष्टः पुष्टः सुधार्मिकः निरामयोह्यरोगश्च दुर्भिक्षभयवर्जितः ८९ न पुत्रमरणं केचित् द्रक्ष्यंति पुरुषाः कचित् नार्यश्चाविधवा नित्यं भविष्यंति पतिव्रताः ९० नैवाग्निजं भयं किंचिन्नाप्सु मज्जंति जंतवः न वातजं भयं किंचिन्नापि ज्वरकृतं तथा ९१

च परं ह्म॰ आणखी, नार्यः ह्म॰ स्त्रिया जात्या, अविधवाः ह्म॰ पतीकरून युक्त, व पतिव्रताः ह्म॰ पतीवाचून दुसरें व्रत नाहीं, ज्यास अशा होत्सात्या, नित्यं भविष्यंति ह्म॰ निरंतर होतील ९० टी॰ च परं ह्म॰ आणखी, किंचित् ह्म॰ स्वल्पही, अग्निजं भयं ह्म॰ अग्नीपासून उत्पन्न जालेलें जें भय तें, न ह्म॰ न होईल, व, जंतवः ह्म॰ प्राणी जे तें, अप्सु ह्म॰ उदकाचे ठायीं, न मज्जंति ह्म॰ बुडणार नाहींत, व, वातजं भयं ह्म॰ पवनापासून ही भय होणार नाहीं, व, किंचित् ह्म॰ स्वल्पही, ज्वरकृतं ह्म॰ ज्वरानें ही भय होणार नाहीं ९१ ७॥ ७॥

तात्पर्य, पूर्वोक्त श्लोकापर्यंत नारदऋषी झालेल्या चरित्रातें कथन करिता जाला, इतःपर उत्तरकांडातें भविष्यत्वेंकरून नारद कथन करितो येणेंकरून रावणवधा, नंतर, राम राज्य करीत असतां पुढें राज्यांत वर्त्तणूक कसी होईल असें वाल्मिकानें नारदास प्रश्न केला असें जाणावें, असतु पुत्र पश्वादिकेंकरून कृशत्वादि न सल्या मुळें संतोषयुक्त, व, धार्मिक, व, रोगरहित, व, दुर्भिक्ष, व, भयरहित ८९ आपण जीवंत असतां पुत्रमरण कोणीही न पाहतील व स्त्रिया विधवा होणार नाहींत, व, पातिव्रत्येंकरून युक्त होतील, ९० व अग्नीपासून भीति, व, उदकामध्यें बुडणें, व, वायूपासून व ज्वरानें भीति ही उत्पन्न होणार नाहीं ९१

टी॰ या श्लोकांतील तीन चरणांहीं आधिदैविक दुःखनिवृत्ती सांगीतली चतुर्थचरणानें अध्यात्मिक दुःखनिवृत्ती कथन केली, अस्तु चपरं ह्म॰ आणखी. क्षुद्भयं ह्म॰ क्षुधेपासून ही भीती होणार नाहीं, व, तथा ह्म॰ तसेंच, तस्करभयं ह्म॰ चोराचा उपद्रव ही होणार नाहीं, चपरं ह्म॰ आणखी, नगराणि ह्म॰ नगरें, व, राष्ट्राणि ह्म॰ देश हे धनधान्यें करून युक्त होतील ९२ टी॰ या श्लोकीं भौतिक दुःखाभाव सांगीतला, अस्तु, यथा ह्म॰ जसें, कृतयुगे ह्म॰ कृतयुगाचे ठायीं, नित्यं ह्म॰ निरंतर, सर्वे ह्म॰ संपूर्ण, मुदिताः ह्म॰ संतोषें करून युक्त होते, तथा ह्म॰ तसे, त्या त्रेतायुगाचे ठायीं, सकल संतोषें करून युक्त होतील, अश्वमे

नचापि क्षुद्भयं तत्र न तस्करभयं तथा नगराणि च राष्ट्राणि धनधान्ययुतानि च ९२ नित्यं प्रमु
दिताः सर्वे यथा कृतयुगे तथा अश्वमेधशतैरिष्ट्वा तथा बहुसुवर्णकैः ९३ गवां कोट्ययुतं द
त्वा ब्रह्मलोकं गमिष्यति असंख्येयं धनं दत्वा ब्राह्मणेभ्यो महायशाः ९४

धशतैः ह्म॰ अश्वमेधसंज्ञक शत यज्ञाहीं, इष्ट्वा ह्म॰ याग करून, तथा ह्म॰ तसेंच, बहुसुवर्णकैः ह्म॰ मानविशेष बहुसुवर्णाहीं करून युक्त ९३ टी॰ गवां कोट्ययुतं ह्म॰ दहा सहस्र कोटी गायी तें, दत्वा ह्म॰ देऊन, व, ब्राह्मणेभ्यः ह्म॰ ब्राह्मणा कारणें, असंख्येयं ह्म॰ असंख्याक, धनं ह्म॰ द्रव्यातें, दत्वा ह्म॰ देवून, महायशाः ह्म॰ मोटा यशस्वी राम जो तो, ब्रह्मलोकं ह्म॰ ब्रह्मलोकाप्रत, गमिष्यति ह्म॰ जायील. ९४

तात्पर्य, भुकेनें पीडित होणार नाहिं, चोराचें भय कध्धां होणार नाहीं, आणि सकल देश धनधान्यें करून युक्त होतील ९२ आणखी सकल जन जसे कृतयुगीं संतोषयुक्त होते तसें त्रेतायुगीं हीं संतोष होतील, कारण, कृतयुगाचे ठायीं, स्वाभाविकें करून अधर्माचा संबंध नव्हता ह्मणून प्रजेस निरंतर आनंद होता, त्रेतायुगीं अधर्माचा पादांश संबंध जरी होता तथापि रामाचा पालन चातुर्यें करून लोकांस आनंद निरंतर होयील, असें सांगीतलें असो, राम शतावधि अश्वमेधानें याग करून तसेंच पुष्कळ सुवर्ण दानानें ९३ दहा सहस्र कोटी गो दान देऊन व असंख्यात धन ब्राह्मणांस देऊन यशस्वी होऊन स्वर्गलोकीं जायील ९४

टी॰ शतगुणान् ह्म॰ शतावधी आहेत गुण जांस अशा, राजवंशान् ह्म॰ राजकुलातें, राघवः ह्म॰ राम जो तो, स्थापयिष्यति ह्म॰ स्थापना करील, चपरं ह्म॰ आणखी, चातुर्वर्ण्यं ह्म॰ ब्रह्मक्षत्रियविट्शूद्र अशा चारि वर्णातें, स्वे स्वे धर्मे आपले आपले धर्माचे ठायीं, नियोक्ष्यति ह्म॰ योजील, ९५ दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ह्म॰ अक्रा सहस्र वर्षपर्यंत, रामः ह्म॰ रामचंद्र जो तो, राज्यं ह्म॰ राज्यातें, उपासित्वा ह्म॰ करून, ब्रह्मलोकं ह्म॰ ब्रह्मलोकाप्रत, प्रयास्यति ह्म॰ जायील, ९६

राजवंशांछतगुणां स्थापयिष्यति राघवः चातुर्वर्ण्यं च लोकेस्मिन् स्वे स्वे धर्मे नियोक्ष्यति ९५
दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च रामो राज्यमुपासित्वा ब्रह्मलोकं प्रयास्यति ९६ इदं
पवित्रं पापघ्नं पुण्यं वेदैश्च संमतम् यः पठेद्रामचरितं सर्वपापैः प्रमुच्यते ९७

टी॰ इदं ह्म॰ हें, पवित्रं ह्म॰ चित्तशोधक, व, पापघ्नं ह्म॰ पापनाशक, व, पुण्यं ह्म॰ सकल पुण्यसाधक आणि, वेदैश्च संमतं ह्म॰ वेदां समान्य अशा, रामचरित्रं ह्म॰ रामचरित्रातें, यः पठेत् ह्म॰ जो पठण करील तो, सर्वपापैः ह्म॰ सकल पापापासून प्रमुच्यते ह्म॰ मुक्त होतो ९७

तात्पर्य . अनेक गुणवृध्धी जसी होयील तसें राजकुलानें स्थापन करील, आणि, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र, या चारी वर्णास ही आपले आपले धर्मांत योजील. ९५ आतां अवताराचा त्याग सांगतात कीं, अक्रा सहस्र वर्षे राज्य करून ब्रह्मलोकाप्रत जायील या श्लोकांत दशवर्षेति॰ उपासित्वा असें पद आहे या पदानें अर्थ होतो कीं नित्य कर्म असें करावें त्यारीतीनें करून, व, ब्रह्मलोक शब्दानें वैकुंठादि लोक स्वीकारील असें आहे, येणें करून स्वकीय नित्य कर्माचा उपभोग घेणार हा पुरुष यास परंपरें करून ब्रह्मलोक प्राप्ती होयील, असें ध्वनित होतें, परतु, राम परब्रह्म, तेथें याचा संभव ही नाहीं, अस्तु ९६ नारद आपण उपदेश केला, याचा संक्षेप करून रामायण पठण केल्याचें फल सांगतों, पापनाशक, व, चित्तशोधक, व, वेदाशीं संमत असें रामचरित्र जो पठण करील तो संपूर्ण पातकापासून मुक्त होतो ९७ ७॥

टी॰ एतत् ह्म॰ हें, आख्यानं ह्म॰ कथानक, व, आयुष्यं ह्म॰ आयुष्कारक अशा, रामायणं ह्म॰ रामायणातें, पठन् ह्म॰ पठण करणा-
रा, नरः ह्म॰ पुरुष जो तो, सपुत्रपौत्रः ह्म॰ पुत्रपौत्रासहवर्तमान, व, सगणः ह्म॰ दासदासीसहवर्तमान या लोकांतील भोगातें भो-
गून, प्रेत्य ह्म॰ मेल्यावर, स्वर्गे ह्म॰ स्वर्गलोकाचे ठायीं, महीयते ह्म॰ पूज्य होतो, ९८ टी॰ या रामायणातें, पठन् ह्म॰ पठण करणा

एतदाख्यानमायुष्यं पठन्रामायणंनरः सपुत्रपौत्रः सगणः प्रेत्य स्वर्गेमहीयते ९८ पठन्-
द्विजोवागृषभत्वमीयात् स्यात्क्षत्रियोभूमिपतित्वमीयात् वणिक्जनः पण्यफलत्वमीयात्जनः
श्चशूद्रोपिमहत्वमीयात् ९९ इत्यर्षिरामायणे आदिकाव्ये वाल्मीकीये नारदवाक्ये संक्षेपो नाम
प्रथमः सर्गः

र, द्विजः ह्म॰ ब्राह्मण जो तो, वागृषभत्वं ह्म॰ शब्दब्रह्मज्ञातृत्वाप्रत, ईयात् ह्म॰ पावेल, व, क्षत्रियः ह्म॰ क्षत्रिय जो तो, भूमिपतित्वं ह्म॰-
णजे राजत्वाप्रत, ईयात् ह्म॰ पावेल, आणि, वणिक्जनः ह्म॰ वाणी लोक जो तो, पण्यफलत्वं ह्म॰ मूलद्रव्याहून दुपटतिपट द्रव्या-
प्रत, ईयात् ह्म॰ पावेल, चपरं ह्म॰ आणखी, शूद्रोपिजनः ह्म॰ शूद्र लोकही ब्राह्मणावाचून इतर श्रेष्ठ जातीतें, ईयात् ह्म॰ पावेल, ९९
इत्यर्षिरामायणे आदिकाव्ये वाल्मीकीये नारदवाक्ये संक्षेपो नाम प्रथमः सर्गः ९९ ॥ ॥ ॥

तात्पर्य, पूर्वश्लोकीं सर्व पातकमोचन द्वारा मोक्षफल सांगीतलें, परंतु, पुण्याला जसें त्रिगुणात्मकत्व आहे तसें पा-
पाराही त्रैगुण्य आहे, त्यास्तव, पुण्याचे त्याज्यत्वास्तव मुमुक्षुफलाचा उद्देश करून अमुमुक्षूचा प्रवृत्ती विषयीं सां-
गतो· आयुष्कारक अशा रामायणातें पठण करील तो या लोकीं पुत्रपौत्रासहवर्तमान भोगांचा उपभोग घेऊन-
मेल्यावर स्वर्गस्थ लोकांही पूजित होत्साता आनंद पावतो, ९८ रामायण पठण करणार जो ब्राह्मण, त्यास ज्ञान
प्राप्ती होईल, आणि, क्षत्रिय जर पठण करील तर भूपतित्व येईल, व, वैश्यांहीं पठण केल्यास मूलद्रव्याहून दु-
पटतिपट मिळखत होईल, व, शूद्रजनास ही मोठेपण येईल, ९९ इत्यर्षिरामायणें आदिकाव्ये वाल्मीकी-
ये नारदवाक्ये संक्षेपो नाम प्रथमः सर्गः समाप्तः ॥ ॥ ॥ ॥ ॥